महाराष्ट्रातील गुन्हेगारीविरुद्ध लढा देणारे एकमेव मराठी वृत्तपत्र...

# महाराष्ट्र क्राईम टाइम्स

MCT वार्ता DIGITAL

प्रकाशन: मुंबई सह एकाच वेळी प्रसारीत ठाणे, पालघर, रत्नागिरी, पुणे, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, जालना, नाशिक

मूल्य २/- रुपये

Maharashtracrimetimes.com | MHCrimeTimes | MAHCrimeTimes | 9803386748 | maharashtracrimetimes@gmail.com

• संपादकः राकेश शंकर गोरे | वर्षः १५, अंकः ३६, पृष्ठः ८ | मुंबई, मंगळवार ३ डिसेंबर २०२४ ते सोमवार ९ डिसेंबर २०२४ • POSTAL REG.NO. MCN/157/2023-2025 • RNI. REG. NO. MAHMAR/2010/33301

## संक्षिप्त

### महापरिनिर्वाण दिनानिमित्त फलाट तिकीट विक्री बंद

■ मुंबई : राकेश गायकवाड

महापरिनिर्वाण दिनानिमित्त मध्य रेल्वेच्या प्रमुख स्थानकांवरील गर्दी नियंत्रित करण्यासाठी फलाट तिकिटांच्या विक्रीवर तात्पुरती बंदी घालण्याचा निर्णय मध्य रेल्वेने घेतला आहे. त्यानुसार फलाट तिकिटांच्या विक्रीवर २ ते ९ डिसेंबरपर्यंत निर्बंध घातले आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त



देशविदेशातील लाखो अनुयायी दादर येथील चैत्यभूमीवर अभिवादन करण्यासाठी येतात. त्यामुळे रेल्वेच्या प्रमुख स्थानकांवर प्रचंड गर्दी होते. त्यामुळे फलाटांवरील गर्दी टाळण्यासाठी मध्य रेल्वेने लांब पल्ल्यांच्या स्थानकांवर फलाट तिकिटांच्या विक्रीवर तात्पुरती बंदी घालण्याचा निर्णय घेतला आहे.

### वसई-विरार मॅरेथॉनसाठी विशेष लोकल

■ वसई : सुचिता देशमुख

वसई-विरार मॅरेथॉन निमित्ताने ८ डिसेंबर रोजी विशेष लोकल चालविण्याचा निर्णय पश्चिम रेल्वेने घेतला आहे. त्यानुसार ८ डिसेंबर रोजी पहाटे चर्चगेट ते विरारपर्यंत दोन




अतिरिक्त विशेष धीम्या लोकल चालविण्यात येतील. ८ डिसेंबर रोजी रात्री २.३० वाजता चर्चगेटहून धीमी लोकल चालविण्यात येईल. ही लोकल विरारला पहाटे ४.०५ मिनिटांनी पोहचेल. यानंतर रात्री ३ वाजता दुसरी विशेष लोकल चालविण्यात येईल. ही लोकल पहाटे ४.३५ वाजता विरारला पोहचेल. या दोन लोकलमुळे मॅरेथॉनमध्ये सहभागी होणाऱ्या नागरिकांना लाभ घेता येईल, अशी माहिती पश्चिम रेल्वे प्रशासनाकडून देण्यात आली.

# महायुती सरकारच्या शपथविधीसाठी जय्यत तयारी



## लाडक्या बहिणींना विशेष निमंत्रणे, ४० हजार पाहुणे, २२ राज्यांचे येणार मुख्यमंत्री

■ मुंबई : विशाल कारंडे

महायुतीचा मुख्यमंत्री कोण होणार? यावर अद्याप शिक्कामोर्तब झालेले नसले तरी शपथविधी ५ डिसेंबरला होणार असून त्याची जय्यत तयारी सुरु करण्यात आली आहे. आझाद मैदानात हा शपथविधी सोहळा पार पडणार आहे. या कार्यक्रमाला लाडक्या बहिणींना विशेष निमंत्रण देण्यात येणार आहे. तब्बल ४० हजार निमंत्रितांची जणांची उपस्थिती असेल, असे महायुतीच्या मंत्रालयीन सूत्रांकडून सांगण्यात येत आहे. महायुतीच्या मुख्यमंत्र्यांच्या शपथविधीच्या सोहळ्याचं महानियोजन करण्यात आले आहे. मुख्यमंत्र्यांच्या शपथविधीसाठी जवळपास ४० हजारजणांची उपस्थिती असणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी गृहमंत्री अमित शाह आणि सर्व केंद्रीय मंत्र्यांच्या उपस्थितीत हा शपथविधी पार पडणार आहे. देशातील २२ राज्यांचे मुख्यमंत्री देखील या कार्यक्रमात सहभागी होणार आहेत. लाडक्या बहिणींना यासाठी विशेष आमंत्रण देण्यात येणार आहे. (शेष पृष्ठ २ वर)

## 'ईव्हीएम हॅकिंग'चा दावा करणाऱ्या हॅकरवर निवडणूक आयोगाकडून गुन्हा दाखल

■ मुंबई : गणेश बागडे

महाराष्ट्रात विधानसभेचा निकाल लागल्यापासून महाविकास आघाडीच्या नेत्यांकडून ईव्हीएम मशीनवर शंका उपस्थित केली जात आहे. यावेळी अनेक नेत्यांकडून एक्स(ट्वीटर) समाज माध्यमावरून एका हॅकरची चित्रफीत अपलोड करण्यात आली आहेत. त्यात आपण ईव्हीएम मशीन हॅक करू शकतो, असा दावा एका हॅकरने केला आहे. त्या चित्रफीतीतील ईव्हीएम हॅकिंगचा दावा करणाऱ्या व्यक्तीविरोधात मुंबईतील दक्षिण प्रादेशिक सायबर पोलीस ठाण्यात माहिती तंत्रज्ञान प्रतिबंधक कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. निवडणूक आयोगाकडून करण्यात आलेल्या तक्रारीवरून दक्षिण सायबर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. मुंबई पोलीस दलातील एका वरिष्ठ अधिकाऱ्याने गुन्हा दाखल झाल्याच्या माहितीला दुजोरा दिला आहे. महाविकास आघाडीतील नेत्यांकडून गेल्या काही दिवसांपासून एक चित्रफीतही वायरल करण्यात येत आहे. ती चित्रफीत एका स्टिंग ऑपरेशनचा भाग आहे. त्यात ईव्हीएम हॅकिंगची माहिती देत असलेल्या व्यक्तीचे नाव सय्यद सुजा आहे. ईव्हीएम विकसित करणाऱ्या इलेक्ट्रॉनिक (शेष पृष्ठ २ वर)




## माहिती अधिकार कायद्याची महाराष्ट्रात दुर्दशा; सर्वाधिक अपिले, तक्रारी प्रलंबित

■ पुणे : अभिजीत येरल्लू

माहिती अधिकार कायद्याच्या (आरटीआय) माध्यमातून लोकशाच्या दृष्टीने पारदर्शकता वाढवणे गरजेचे असताना आपण विकलांगतेकडे चाललो आहोत. राजकीय अनास्थेचा फायदा घेऊन प्रशासकीय व्यवस्थेने कायद्याचा बट्ट्याबोळ केला आहे, अशी टीका माजी सनदी अधिकारी महेश झगडे यांनी केली. नोकरशाहीचे कुभांड रचणाऱ्यांविरोधात हा कायदा व्यापक करण्यासाठी मोठे जनआंदोलन उभे करण्याची गरजही त्यांनी व्यक्त केली. प्रशासनात पारदर्शकता आणि उत्तरदायित्व आणण्यासाठी देशात माहिती अधिकार कायदा लागू होऊन १९ वर्षे पूर्ण होत आहेत. त्या पार्श्वभूमीवर सजग नागरिक मंचातर्फे 'माहिती अधिकाराची दशा आणि दिशा' या विषयावर झालेल्या चर्चासत्रात झगडे बोलत होते. विधीज्ञ डॉ. प्रल्हाद कचरे, मंचाचे अध्यक्ष विवेक वेलणकर, जुगल राठी या वेळी उपस्थित होते. (शेष पृष्ठ २ वर)




## राज्यात दुचाकीवर मागे बसणाऱ्यालाही हेल्मेट सक्ती; वाहतूक विभागाचे आदेश जारी

■ मुंबई : प्रथमेश चव्हाण

गेल्या काही वर्षांमध्ये राज्यात अपघाताचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळेच राज्यात शून्य अपघात मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेद्वारे अपघातांमुळे होणारे मृत्यू आणि जखमींची संख्या नियंत्रणात आणण्याचे प्रयत्न सुरू आहेत. सर्वाधिक अपघात दुचाकीस्वारांचे होत असल्याचे निदर्शनास आले असून एकूण अपघाती मृत्यूच्या संख्येत दुचाकीस्वारांचे प्रमाण सुमारे ६० टक्के आहे. त्यामुळे दुचाकीस्वारासह त्यांच्या मागे बसणाऱ्या सहप्रवाशाला हेल्मेटसक्ती करण्यात आली आहे. अतिरिक्त पोलीस महासंचालक, वाहतूक कार्यालयाने यासंदर्भातील आदेश जारी केले आहेत. आता वाहतूक पोलिसांनी या आदेशाची प्रभावीपणे अंमलबजावणी सुरू केली आहे. त्याचबरोबर परिवहन विभागानेही राज्यात शून्य अपघात मोहीम हाती घेतली आहे. या मोहिमेअंतर्गत दुचाकीस्वार आणि सहप्रवाशाला हेल्मेटसक्ती केली आहे. राज्यात दुचाकीस्वारांच्या अपघाताचे प्रमाण सातत्याने वाढत आहे. विनाहेल्मेट दुचाकीस्वार आणि सहप्रवाशांच्या अपघाती मृत्यूंची संख्याही अधिक आहे. विनाहेल्मेट दुचाकीस्वार व सहप्रवाशाच्या विरोधात मोटार वाहन कायदा १९८८ मधील कलम १२८ आणि १२९ अंतर्गत पोलिसांकडून प्रभावीपणे अंमलबजावणी होत नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे वाहतूक विभागाचे अतिरिक्त पोलीस महासंचालक अरविंद साळवे यांनी हेल्मेटचा



वापर बंधनकारक असल्याचे आदेश दिले आहे. परिणामी, दुचाकीस्वार व पाठीमागे बसलेल्या सहप्रवाशाला हेल्मेट घालणे बंधनकारक असून, ते नसल्यास कारवाई करण्याचे आदेश अतिरिक्त पोलिस महासंचालकांनी राज्यातील सर्व पोलिस आयुक्त आणि अधीक्षकांना दिले आहेत. पूर्वी दुचाकीस्वार आणि सहप्रवाशांवर विनाहेल्मेटविषयक कारवाई करताना ई-चलन यंत्रामध्ये दोन्ही प्रकरणांसाठी एकच गट होता. त्यानुसारच कारवाई करण्यात येत होती.

## महाराष्ट्राच्या निवडणूक निकालानंतर केजरीवालांचा काँग्रेसला धक्का, दिल्लीच्या विधानसभा निवडणुकीबाबत मोठा निर्णय

■ नवी दिल्ली : प्रगती शर्मा

हरियाणा व महाराष्ट्रात काँग्रेसचा दारुण पराभव झाल्यानंतर आम आदमी पार्टी सतर्क झाली आहे. अशातच या पक्षाने दिल्लीची आगामी विधानसभा निवडणूक स्वबळावर लढवण्याचा निर्णय घेतला आहे. पक्षाचे प्रमुख अरविंद केजरीवाल यांनी निवडणुकीआधी 'एकला चलो रे'चा नारा दिला आहे. त्यांनी पत्रकार परिषद घेऊन त्यांचा निर्णय जाहीर केला. केजरीवाल म्हणाले, 'आगामी दिल्ली विधानसभा निवडणुकीत आम आदमी पार्टी कोणत्याही पक्षाबरोबर आघाडी करणार नाही. आमच्या पक्षाने ही निवडणूक स्वबळावर लढवण्याचा निर्णय घेतला आहे'. अरविंद केजरीवाल यांनी आतापर्यंत आघाडीबाबत ठाम भूमिका मांडली नव्हती. मात्र, हरियाणा विधानसभेच्या निवडणुकीनंतर आपने कोणत्याही पक्षाशी युती अथवा आघाडी न करण्याचा सूर आळवला होता. त्यावर आज शिक्कामोर्तब झालं. काँग्रेसने हरियाणात आम आदमी पार्टीला बरोबर घेतलं नव्हतं. तसेच त्या निवडणुकीत



काँग्रेसला पराभवाचा सामना करावा लागला होता. पाठोपाठ महाराष्ट्रात काँग्रेसने शिवसेना (ठाकरे) व राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) या दोन मोठ्या पक्षांशी आघाडी केली होती. तरीदेखील महाराष्ट्रात काँग्रेसला केवळ १६ जागा जिंकता आल्या. दोन राज्यांमध्ये काँग्रेसचा दारुण पराभव झाल्यानंतर आता आम आदमी पार्टीने काँग्रेसबरोबर आघाडी न करण्याचा निर्णय घेतला आहे. (शेष पृष्ठ २ वर)

## लाडकी बहीण योजनेचे निकष बदलले का? अजित पवारांनी स्पष्टच सांगितलं...

■ मुंबई : प्रथमेश चव्हाण

महाराष्ट्र राज्यातील महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी, त्यांच्या आरोग्य व पोषणामध्ये सुधारणा करणे आणि कुटुंबातील त्यांची निर्णायक भूमिका मजबूत करण्यासाठी राज्य सरकारने सहा महिन्यांपूर्वी 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' सुरु केली आहे. लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात अपयशी ठरल्यानंतर महायुती सरकारने महिलांना थेट आर्थिक लाभ देणारी ही योजना आणली आहे. निवडणुकीच्या तोंडावर ही योजना लागू करत असताना काही माफक अटींसह २१ वर्षे ते ६५ वर्षांपर्यंत वय असलेल्या सर्व महिलांना सरसकट या योजनेचा लाभ दिला जात आहे. निवडणूक काळात आचारसंहितेमुळे ही योजना थांबवण्यात आली होती. आता निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाली असून निवडणुकीचा निकालही लागला आहे. या योजनेमुळे महाराष्ट्रात महायुतीला मोठा लाभ झाला असून जनतेने महायुतीच्या पदरात बहुमतांचं दान टाकलं आहे. त्याचबरोबर आचारसंहिता देखील उठवली आहे. त्यामुळे राज्यातील महिलांना लाडकी बहीण योजनेच्या डिसेंबर महिन्यातील हप्त्याची प्रतीक्षा आहे. (शेष पृष्ठ २ वर)



## पुढील उपोषण आझाद मैदानात, तीर्थक्षेत्र तुळजापुरातून मराठायोद्धा मनोज जरांगे पाटील यांची घोषणा

■ धाराशिव : सतिश सोनावणे

सरकार कोणाचेही आले तरी आरक्षण घेणारच. त्यासाठी पुढील कार्यक्रमाचे नियोजन सुरु आहे. आता सामूहिक आमरण उपोषण करण्याचा निर्णय घेतला आहे. आंतरवली सराटीसह प्रत्येक घरात हे उपोषण केले जाईल. समाजाचा निर्णय अद्याप घेतलेला नाही. कदाचित यावेळी मुंबई येथे आझाद मैदानावर असू शकेल, अशी जाहीर घोषणा कुलस्वामीनी तुळजाभवानी देवीचे दर्शन घेतल्यानंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. आरक्षणाची यापुढील लढाई सामूहिक आमरण उपोषणाने केली जाईल. कदाचित हे उपोषण मुंबई येथे आझाद मैदानावरही होऊ शकते. आता आरक्षणाची ही चळवळ थांबवणार नसल्याचे जरांगे पाटील यांनी स्पष्ट केले. महाराष्ट्रात मराठा समाजाशिवाय कोणाचीही सत्ता स्थापन होऊ शकत नाही. यावेळी मराठा



मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी केली. विधानसभा निवडणुकीत फॉर्म्युला जुळला नाही अन्यथा सुपडा साफ केला असता, अशा शब्दांत त्यांनी राजकीय टिप्पणीही केली. जरांगे पाटील हे आंतरवली सराटी येथून रविवारी तुळजापूर आणि पंढरपूर येथे दर्शनासाठी निघाले होते. धाराशिव जिल्ह्यात त्यांचा ताफा दाखल होताच ठिकठिकाणी जंगी स्वागत करण्यात आले. समाजाने मोठ्या संख्येने ओबीसी आमदारही निवडून आणले आहेत. विधानसभा निवडणुकीच्या दरम्यान फॉर्म्युला जुळून आला नाही. अन्यथा सुपडा साफ केला असता. मराठा आरक्षणासाठी इथून पुढे सामूहिक आमरण उपोषणाचे हत्यार उपसणार असल्याचे जाहीर करुन सरकार कोणाचेही असो, मुंडक्यावर पाय देऊन आरक्षण घेणार. (शेष पृष्ठ २ वर)

## आझाद मैदानावरील सोहळ्याला पंतप्रधानांसह ज्येष्ठ नेत्यांची उपस्थिती

■ मुंबई : नितीन देवळेकर

महायुतीमध्ये सरकार स्थापण्याबाबतची चर्चा थंडावली असली तरी येत्या गुरुवारी म्हणजे ५ डिसेंबरला नवीन सरकारचा शपथविधी पार पडेल, असे भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी शनिवारी जाहीर केले. खातेवाटप आणि मंत्र्यांची संख्या यावर तिन्ही घटक पक्षांच्या नेत्यांमध्ये सोमवारनंतरच चर्चा केली जाणार आहे. भाजपकडून काही नवीन चेहऱ्यांना मंत्रिमंडळात संधी दिली जाण्याची चिन्हे आहेत. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील शपथविधीचा मुहूर्त अखेर ठरला असून ५ डिसेंबरला सायंकाळी पाच वाजता मुंबईत आझाद मैदानात शपथविधी समारंभ होणार आहे. नवे सरकार देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली स्थापन होणार असून भाजप पक्षश्रेष्ठींनी त्यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, भाजप अध्यक्ष नड्डा,केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्यासह भाजपशासित राज्यांचे मुख्यमंत्री, एनडीएतील घटक पक्षांचे नेते, संत, महंत व धर्मगुरू हे शपथविधी समारंभास उपस्थित राहतील.



फडणवीस यांच्या नावावर पक्षश्रेष्ठींनी शिक्कामोर्तब केल्याने भाजप विधिमंडळ पक्षाची नेतानिवडीची बैठक ३ किंवा ४ डिसेंबरला विधान भवनात घेण्याचा प्रस्ताव आहे. त्यामुळे राज्यभरातून येणाऱ्या आमदारांना बैठक व शपथविधी समारंभास हजर राहणे सोयीचे होईल. बावनकुळे यांनी शपथविधी समारंभास राज्यभरातील कार्यकर्त्यांना मुंबईत येण्याच्या आणि त्यादिवशी राज्यभरात जल्लोष करण्याच्या सूचना दिल्या आहेत. या समारंभाच्या व जल्लोषाच्या तयारीसाठी त्यांनी आमदार व पदाधिकाऱ्यांची बैठकही घेतली. भाजपने राज्यभरातून सुमारे १५ हजार कार्यकर्त्यांना येण्यासाठी नियोजन केले आहे. पहिल्या टप्प्यात २५-२७ मंत्र्यांचा समावेश होण्याची शक्यता आहे. या मंत्रिमंडळात भाजपला २०, शिवसेनेला (एकनाथ शिंदे) १३ व राष्ट्रवादी काँग्रेसला (अजित पवार) ९ मंत्रीपदे असे सूत्र निश्चित झाल्याचे समजते. मंत्रिमंडळात काही जागा रिक्त ठेवल्या जाणार असून पहिल्या टप्प्यात प्रत्येकी आठ-नऊ मंत्र्यांचा शपथविधी होण्याची शक्यता आहे. भाजपकडून काही नवीन व तरुण चेहऱ्यांना संधी दिली जाणार असून सत्तरी गाठलेल्या नेत्यांना संधी मिळणे अवघड आहे.




# ईव्हीएमवरील शंका दूर व्हावी

भारतीय लोकशाही जगातील सर्वात मोठी आणि वैविध्यपूर्ण लोकशाही म्हणून ओळखली जाते. मात्र, महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीच्या निकालानंतर इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशीन अर्थात ईव्हीएमविषयी उभा राहिलेला वाद देशातील निवडणूक व्यवस्थेवरील विश्वासार्हतेबाबत प्रश्न उपस्थित करत आहे. महायुतीला मिळालेल्या अभूतपूर्व विजयामुळे आणि महाविकास आघाडीने व्यक्त केलेल्या शंका-कुशंकांमुळे हा विषय अधिक गडद झाला आहे. मतदान प्रक्रिया आणि मतमोजणीतील विसंगतीमुळे केवळ निवडणुकीच्या निकालांवरच नाही तर लोकशाही प्रक्रियेवरही संशयाचे ढग दाटले आहेत. त्यामुळे आगामी निवडणुकांमध्ये मतदारांचा सरकारी व्यवस्थेवरील विश्वास उडून त्याचा थेट परिणाम मतदानाचा टक्का घसरण्यावर होऊ शकतो. त्यामुळे केवळ इव्हीएमच्या गप्पांमध्ये तथ्य नाही, असे म्हणण्यापेक्षा यंत्रणेने त्रुटींमध्ये सुधारणा करून व्यवस्थेत आमूलाग्र बदल घडवून आणणे गरजेचे आहे. काही मतदारसंघांमध्ये प्रत्यक्ष मतदानापेक्षा कमी मते मोजली गेली आहेत, तर काही ठिकाणी मतमोजणीतील आकडे मतदानाच्या आकड्यांपेक्षा अधिक आहेत. यामुळे निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकतेवर मोठे प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. विशेषत: प्रत्यक्ष मतदान आणि ईव्हीएममधील आकडेवारीत तफावत आढळल्याची चर्चा सुरू झाली.

सुरुवातीला २८८ पैकी ९५ मतदारसंघ असे होते की, ज्यात मतदान आणि ईव्हीएमची आकडेवारी जुळत नव्हती. त्यातच निवडणूक आयोगाने मतदानाची दोनदा दिलेली वेगवेगळी टक्केवारी हा कळीचा मुद्दा बनला आहे. एकूण जेवढे मतदान झाले, त्यापेक्षा कमी मते मतमोजणीतून समोर आल्याचे राज्यातील आठ मतदारसंघात दिसले आहे. तर उर्वरित २८० मतदारसंघात हीच परिस्थिती उलटी आहे. तिथे जेवढे मतदान झाले त्यापेक्षा मतमोजणीतून समोर आलेली मते जास्त आहेत. यात सर्वाधिक तफावत ही आष्टी आणि उस्मानाबाद मतदारसंघात दिसते. जेथे मतदानापेक्षा मतमोजणीत अनुक्रमे ४ हजार ५३८ आणि ४ हजार १५५ वाढीव मते समोर आली आहेत. पाचोरा मतदारसंघातील केंद्र क्रमांक २५८ ची मतमोजणीच झाली नसल्याचा धक्कादायक प्रकारही उघडकीस आला आहे. या केंद्रावर शून्य मते दर्शविण्यात आली आहेत. प्रत्यक्षात येथे मतदानाच्या दिवशी रांगा दिसून आल्या होत्या. सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट मतदारसंघातील बूथ क्रमांक २७० मध्ये एका उमेदवाराने मतदान केले, परंतु या मतदार केंद्रातून त्याला एकही मत मिळाल्याचे दिसत नाही.

उमेदवाराने स्वत:ला मत दिले नाही, असे कसे होऊ शकते? लातूर शहर आणि ग्रामीण या दोन्ही मतदारसंघातील



जिंकलेल्या आणि हरलेल्या उमेदवारांची मतांची संख्या सारखीच आहे. लातूर शहरातून कॉंग्रेसचे उमेदवार अमित देशमुख यांना १ लाख १२ हजार मते आहेत. तर भाजपच्या पराभूत उमेदवार डॉ. अर्चना पाटील यांना १ लाख ५ हजार मते आहेत. लातूर ग्रामीणमधून भाजपचे विजयी उमेदवार रमेश कराड यांना १ लाख १२ हजार मते आहेत. तर कॉंग्रेसचे पराभूत उमेदवार धीरज देशमुख यांना १ लाख ५ हजार मते आहेत. मतांच्या या सारखेपणाचा योग इतका तंतोतंत कसा जुळून आला? दहिसर विधानसभा मतदारसंघातील मनसेचे उमेदवार राजेश येरुणकर यांनी सांगितले की, ते जेथे राहतात तेथे मनसेला केवळ दोनच मते मिळाली. प्रत्यक्षात नेरुळकर यांच्यासह त्यांची आई, पत्नी, मुलगी यांनीही मतदान केले आहे. म्हणजे त्यांच्या घरच्यांनीही त्यांना मत दिले नाही? असे कसे होऊ शकते?

याच पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीने निवडणुकीच्या निकालांवर टीका करत ईव्हीएमच्या जागी पुन्हा बॅलेट पेपर पद्धती सुरू करण्याची मागणी केली आहे. बॅलेट पेपर ही प्रक्रिया विश्वासार्ह वाटत असली तरी ती अत्यंत खर्चिक आणि वेळखाऊ ठरते. त्याचबरोबर मतमोजणी प्रक्रियेत मानवी चुका होण्याचा धोका अधिक राहतो. अशा परिस्थितीत, ईव्हीएमच्या कार्यप्रणालीत सुधारणा करण्याचा पर्याय अधिक व्यवहार्य ठरतो. व्होटर व्हेरिफायबल पेपर ऑडिट ट्रेल अर्थात व्हीव्हीपॅट हे ईव्हीएमसह जोडलेले उपकरण आहे, ज्यामुळे मतदाराला आपले मत योग्य उमेदवाराच्या नावावर पडले आहे का हे पडताळता येते. प्रत्येक मतदारसंघातील किमान ५० टक्के व्हीव्हीपॅट स्लिप्सची तपासणी केली गेली पाहिजे. यामुळे मतमोजणीतील विसंगती कमी होऊ शकते. ईव्हीएम प्रणालीची विश्वसनीयता तपासण्यासाठी देशातील तंत्रज्ञान तज्ज्ञांची स्वतंत्र समिती स्थापन करणे आवश्यक आहे. या समितीकडून ईव्हीएमची रचना, त्याची सायबर सुरक्षा, आणि त्याच्या वापरातील संभाव्य त्रुटींचा सखोल अभ्यास होऊ शकतो. मतदानानंतर प्रत्येक ईव्हीएमचे सखोल डिजिटल ऑडिट केले गेले पाहिजे. मतदारांनी दिलेल्या मतांचे रेकॉर्ड आणि मतमोजणीतील आकडे यामध्ये जराही तफावत राहणार नाही, याची खात्री करणे आवश्यक आहे. थोडक्यात ईव्हीएमवरील वाद हा केवळ तांत्रिक प्रश्न नाही, तर तो लोकशाहीवरील विश्वास टिकवण्याचा मुद्दाही आहे. देशातील नागरिकांचा निवडणूक प्रक्रियेवर विश्वास कायम राहण्यासाठी निवडणूक आयोगाने त्वरित ठोस पावले उचलली पाहिजेत. या संदर्भात देशव्यापी चर्चा आणि अभ्यास आवश्यक आहे. लोकशाहीची पायाभूत रचना अधिक भक्कम ठेवण्यासाठी ही वेळ निर्णायक ठरेल. आज मतदान जागृती बऱ्यापैकी झाली आहे, परंतु प्रत्येक निवडणुकीत ईव्हीएमवर संशय वाढत असल्याने त्याचा परिणाम मतदानाच्या टक्क्यावर होणार आहे. म्हणूनच ईव्हीएमविषयी जे जे प्रश्न उपस्थित होत आहेत, त्याची शास्त्रीय उत्तरे देण्याचे कर्तव्य आता निवडणूक आयोगाने पार पाडायला हवे.

पान १ वरुन...

## महायुती सरकारच्या...

जवळपास दोन हजार व्हीव्हीआयपींच्या पासेसची यासाठी सोय करण्यात येणार आहे. आझाद मैदानात १३ विशेष ब्लॉकमध्ये लोकांच्या बसण्याची व्यवस्था असणार आहे. यामध्ये तीन स्टेजची उभारणी केली जाणार आहे. एक मुख्य स्टेज आणि दोन त्याच्या आजूबाजूला छोट्या स्टेजची उभारणी केली जाणार आहे. विविध धर्माचे संत-महंत, भाजपशासित राज्यातील मुख्यमंत्र्यांची यात उपस्थिती असेल. संत महंतांसाठी वेगळ्या स्टेजची उभारणी केली जाणार आहे. खासदार आणि आमदारांसाठी देखील वेगळी आसनव्यवस्था केली जाणार आहे. महायुतीच्या पदाधिकाऱ्यांसाठी देखील वेगळी आसन व्यवस्था असणार आहे. दरम्यान, येथील आझाद मैदानावर सध्या शपथविधी सोहळ्याची जोरदार तयारी प्रशासनाने चालवली आहे. भाजपाच्या केंद्रीय नेतृत्वाने मंत्रीपदासाठी अटी जाहीर केल्या आहेत. या अटी पूर्ण करणाऱ्यांना मंत्रीपदे मिळणार आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी मंत्रिमंडळात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या आमदारांचे रिपोर्ट कार्ड मागवले आहेत. लोकसभा निवडणुकीत संबंधित आमदाराची कामगिरी कशी होती, लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत संबंधित व्यक्तीने प्रामाणिकपणे काम केले का? हे पाहणे बाकी आहे. मंत्रिमंडळात इच्छूक माजी मंत्री असतील, तर महायुती सरकारच्या काळात संबंधित मंत्र्याने मंत्रालयात कशी काय सेवा केली? संबंधित व्यक्ती किती वेळ मंत्रालयात काम करत होती. महायुतीतील त्यांच्या घटक पक्षाच्या आमदारांशी मंत्र्याची वागणूक कशी होती? मंत्र्यांनी केंद्र आणि राज्याच्या निधीचे वाटप कसे केले? संबंधित मंत्री युती धोक्यात घालतील अशी परिस्थिती होती का? त्यांनी काही वादग्रस्त विधान केले होते का? या मुद्द्यांचे रिपोर्ट कार्ड घेऊन अमित शहा यांनी महायुतीच्या नेत्यांना दिल्लीत बोलावले आहे.

## ‘ईव्हीएम हॅकिंग’चा दावा...

कॉर्पोरेशन ऑफ इंडिया या कंपनीत त्याने २००९ ते २०१४ या काळात काम केल्याचे सांगितले जाते. तसेच तो स्वत:ला सायबर तज्ज्ञ असल्याचा दावा केला आहे. इलेक्शन कमिशन आणि भारत इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड या दोन सार्वजनिक मालकीच्या कंपन्यांकडून निवडणूक आयोगासाठी ईव्हीएमची निर्मिती केली जाते. चित्रफीतीमध्ये दोन व्यक्ती एका कथित हॅकरशी ईव्हीएम हॅकिंगबाबत चर्चा करत आहेत. त्यावर हॅकरला १०५ उमेदवारांपैकी ६३ उमेदवारांना जिंकवून देण्याबाबत विचारणा करण्यात आली होती. त्यावेळी हॅकर सय्यद सुजाने त्यासाठी व्हीव्हीपॅट मशीनचा क्रमांक लागेल, असा दावा केला आहे. तसेच २८८ मतदारसंघापैकी २८१ ठिकाणी आम्हाला ईव्हीएमचा ॲक्सेस आहे, असेही तो म्हणला होता. हॅकिंगसाठी ईव्हीएम ठेवलेल्या ठिकाणी हायस्पीड इंटरनेट कनेक्शन आणि फिल्डवर काही माणसे लागतील, असेही सुजाने सांगितले होते. याप्रकरणी पोलीस सुजासह याप्रकरणाशी संबंधीत इतर व्यक्तींबाबत तपास करत आहेत.

## माहिती अधिकार...

‘कामगारांच्या आंदोलनातून जन्माला आलेला ‘आरटीआय’ कायदा सक्षम होण्याऐवजी कमकुवत करण्यावर प्रशासकीय व्यवस्थेचा भर आहे. हा कायदा संसदेने केला आहे. त्यामुळे त्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी लोकप्रतिनिधींनी प्रयत्न करावेत. त्यासाठी जनतेने त्यांना उत्तरदायी केले पाहिजे. असे केले तरच प्रशासकीय व्यवस्थेवर अंकुश राहील. तंत्रज्ञानाचा हस्तक्षेप वाढवणेही महत्वाचे आहे. राज्यघटनेत भारतीयांना घटनात्मक सार्वभौमत्व अधोरेखित केले आहे. माहिती अधिकार कायदा सक्षम झाल्यास जनतेचा लोकशाहीतील सहभाग वाढेल,’ असे कचरे यांनी नमूद केले. सद्य:स्थितीला राज्यात माहिती आयोगाच्या आयुक्तांची अनेक पदे रिक्त आहेत. त्यावर सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची नियुक्ती केली जाते. त्यामुळे ही सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची रोजगार हमी योजना असून, रिक्त पदांवर माहिती अधिकार क्षेत्रात कार्यरत व्यक्तींची नियुक्ती करण्यासाठी चळवळ सुरू केली पाहिजे, अशी अपेक्षाही झगडे यांनी व्यक्त केली. ‘आरटीआय’च्या वाढत्या वापरामुळे प्रशासनात धाक निर्माण झाला आहे. मात्र, अद्याप त्याचा वापर पूर्ण क्षमतेने होत नसून त्याला पंगू करण्याचे प्रयत्न प्रशासन करत आहे. परिणामी देशभरात साडेचार लाख द्वितीय अपिले प्रलंबित आहेत. त्यातही महाराष्ट्रात सर्वाधिक अपिले, तक्रारी प्रलंबित आहेत, अशी माहिती कचरे यांनी दिली.

## महाराष्ट्राच्या निवडणूक...

केजरीवाल यांच्या पक्षाने दिल्लीची विधानसभा निवडणूक स्वबळावर लढवण्याचा निर्णय घेतला आहे. केजरीवालांच्या या निर्णयामुळे दिल्लीत पुन्हा एकदा आप, भाजपा व कॉंग्रेसमध्ये तिरंगी लढत पाहायला मिळणार आहे. आपने लोकसभा निवडणुकीत कॉंग्रेसशी आघाडी केली होती. मात्र त्या निवडणुकीत त्यांना फायदा झाला नाही, असं आप नेत्यांनी जाहीरपणे बोलून दाखवलं होतं. तर, हरियाणात सत्ता मिळण्याची शक्यता दिसू लागल्यावर कॉंग्रेसने या राज्यात मित्रपक्षांना बरोबर घेतलं नाही. सुरुवातीला आप व कॉंग्रेसमध्ये आघाडी करण्याबाबत व जागावाटपावर चर्चा झाली. मात्र आपला कॉंग्रेसने अधिक जागा देण्यास नकार दिल्यानंतर तिथे आघाडी होऊ शकली नाही. परिणामी दोन्ही पक्ष वेगवेगळे लढले. या राज्यात कॉंग्रेसला पराभवाचा सामना करावा लागला. दरम्यान, आपने दिल्लीची विधानसभा निवडणूक स्वबळावर लढवण्याचा निर्णय घेतला आहे. आप नेत्यांनी हरियाणाच्या निवडणुकीवेळीच याबाबतचे संकेत दिले होते. पक्ष प्रमुखांनी आज त्यावर शिक्कामोर्तब केलं.

## लाडकी बहीण योजनेचे...

महायुती सरकारने निवडणूक काळात घोषणा केली होती की महाराष्ट्रात पुन्हा एकदा त्यांचं सरकार आलं तर लाडकी बहीण योजनेअंतर्गत महिलांना १,५०० रुपयांऐवजी २,१०० रुपयांचा हप्ता दिला जाईल. दुसऱ्या बाजूला दबक्या आवाजात चर्चा होती की निवडणूक झाल्यावर ही योजना बंद होईल किंवा या योजनेचे निकष बदलले जातील. सरसकट सर्वच महिलांना या योजनेचा लाभ मिळणार नाही, अशा पद्धतीची चर्चा सुरू होती. त्यातच नोव्हेंबर महिना संपला असून अजून या महिन्याचा योजनेचा हप्ता महिलांना वितरीत केलेला नाही. त्यामुळे महिलांसह राज्यातील जनतेच्या मनात या योजनेबाबत संभ्रम आहे. दरम्यान, राज्यातील काळजीवाहू सरकारचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या योजनेबाबत भाष्य केलं आहे. तसेच महिलांच्या मनातील संभ्रम दूर करण्याचा प्रयत्न केला आहे. अजित पवारांनी स्पष्ट केलं की लाडकी बहीण योजनेच्या निकषांमध्ये बदल केलेले नाहीत.

## पुढील उपोषण आझाद...

त्यासाठी मुंबई येथे आझाद मैदानावरही आंदोलन करण्याची वेळ आल्यास मागे हटणार नाही, असा इशारा जरांगे पाटील यांनी यावेळी दिला. दरम्यान, जरांगे पाटील यांचा ताफा जिल्ह्यात दाखल होताच महामार्गावरील विविध गावांत त्यांचे फुलांची उधळण करुन स्वागत करण्यात आले. तीर्थक्षेत्र तुळजापुरात मोठ्या जल्लोषात छत्रपती शिवाजी महाराज चौक ते तुळजाभवानी मंदिरापर्यंत मराठा समाजबांधवांनी एक मराठा लाख मराठा अशा घोषणा देत उत्स्फुर्त रॅली काढली. त्यानंतर जरांगे पाटील यांनी तुळजाभवानी देवीचे दर्शन घेतले. त्यानंतर त्यांचा ताफा पंढरपूरकडे रवाना झाला.

# डोक्यावर पडलात तर!

मुंबईसह राज्यभरात पुन्हा एकदा हेल्मेटसक्तीचा विषय जोर धरताना दिसत आहे. त्याला कारणीभूत ठरले आहे ते अपर पोलीस महासंचालक (वाहतूक) कार्यालयाने २५ नोव्हेंबर २०२४ रोजी जारी केलेले एक परिपत्रक. या परिपत्रकानुसार राज्यातील विविध शहरे आणि जिल्ह्यांतील पोलीस आयुक्त, पोलीस सहआयुक्त आणि पोलीस अधीक्षकांना विनाहेल्मेट वाहन चालवणाऱ्या चालकांसोबतच विनाहेल्मेट सहप्रवाशावरही कडक कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. मागील ५ वर्षांमध्ये वाढलेले रस्ते अपघात आणि विनाहेल्मेट वाहनचालक, सहप्रवाशाविरोधात कडक कारवाई होत नसल्याकडे या परिपत्रकातून अंगुलिनिर्देश करण्यात आला आहे. एकूणच काय तर रस्ते अपघातांच्या वाढत्या संख्येचा हवाला देत महाराष्ट्र वाहतूक विभागाने पुन्हा एकदा राज्यभर हेल्मेटसक्तीचा विषय हाती घेतला आहे, तर दुसरीकडे वाहनचालक या विषयावर पुन्हा नाकं मुरडू लागले आहेत. वाहतूक पोलिसांच्या ‘वर’कमाईत भर पडावी इथपासून ते हेल्मेट कंपन्यांच्या विक्रीत वाढ व्हावी इथपर्यंतच्या चर्चा सोशल मीडियावर हॉट टॉपिक होऊ लागल्या आहेत.

आपल्याकडे हेल्मेटसक्तीचे फर्मान काढावे लागते हेच मुळात दुर्दैवी आहे. रस्ते अपघातांची कारणमीमांसा करताना असे आढळते की यांत्रिक दोषापेक्षा मानवी दोषाने होणाऱ्या अपघातांचे प्रमाणच भारतात सर्वाधिक आहे. मद्यपान करून वाहन चालवणे, मोबाईलवर वा वाहनातील सहप्रवाशांसोबत बोलत रस्त्याकडे लक्ष न देता वाहन चालवणे, पुरेशी झोप न घेता रात्रीच्या वेळेत वाहन चालवणे, सिग्नल वा लेनची शिस्त न पाळणे, वेगाने वाहन चालवणे, सीट बेल्ट न लावणे या व इतर अनेक कारणांमुळे चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटून बहुतांश चारचाकींचे अपघात होतात. दुचाकीस्वारांना होणाऱ्या अपघातांची कारणेही वेगळी नाहीत. भारतात दरवर्षी सरासरी दीड लाखांहून अधिक जण रस्ते अपघातांमध्ये प्राण गमावतात. यात सर्वाधिक अपघात हे दुचाकी वाहनांचे असून डोक्याला गंभीर दुखापत होऊन मृत्युमुखी पडणाऱ्यांचे प्रमाण मोठे आहे. अशा वेळी हेल्मेट नावाचे महत्त्वपूर्ण सुरक्षा कवच घालण्याकडे भारतीय दुचाकीस्वार दुर्लक्ष का करतात, हा संशोधनाचा विषय असून त्यावर आधी काम होणे गरजेचे आहे. मनात आले की हेल्मेटसक्ती लागू करायची, मुख्य रस्त्यातील वाहतुकीला शिस्त लावण्याऐवजी कुठेतरी आडबाजूला लपून बसायचे आणि नियम मोडणाऱ्या वाहनचालकांकडून दंडाच्या स्वरूपात पैसे उकळायचे, पोलिसांच्या या छळवादी वृत्तीलाही वाहनचालक वैतागलेत. दोन वर्षांपूर्वी संजय पांडे मुंबई पोलीस आयुक्तपदी असताना मुंबईत अशीच हेल्मेटसक्ती लागू करण्यात आली होती. मुंबई पोलिसांच्या वाहतूक विभागाने २५ मे २०२२ रोजी एक परिपत्रक जारी करीत हेल्मेटसक्तीसाठी मुंबईकरांना १५ दिवसांची मुदत दिली होती. ही मुदत संपताच पोलिसांनी धडक कारवाई सुरू केली.


**महाराष्ट्र शासन**
इलाखा शहर विभाग, (सा.बां.)
**ई -निविदा सुचना क्र. ५१ सन २०२४-२०२५**

कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई (दुरध्वनी क्रंमांक-२२०१६९७५ /२२०१६९७७) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून खालील कामाकरीता ब-१ नमुन्यातील निविदा ई- निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई यांनी राखून ठेवला आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम रु. लक्ष |
|---|---|---|
| १ | मलबार हिल मुंबई येथील सह्याद्री राज्य अतिथीगृहातील तिसऱ्या मजल्यावरील छताचे गळती प्रतिबंधकाचे काम करणे. | ४२.०६ |
| २ | मंत्रालय मुंबई मुख्य इमारत १ ल्या मजल्यावरील राज्य आपातकालीन ऑपरेशन केंद्र विभागाची दुरुस्ती व नुतनीकरण करणे. | ७१.७७ |

ई-निविदा उपलब्ध कालावधी- दि. २.१२.२०२४ ते दि. १६.१२.२०२४ पर्यंत.
ई-निविदा उघडणे- दि. १७.१२.२०२४ रोजी दुपारी ३.०० वाजता
निविदा सुचने मध्ये काही बदल/सुधारणा करावयाची असल्याचे शुध्दीपत्रक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात येणार नाही. त्याबत सर्व बदल ऑनलाईन निविदा प्रक्रियेमध्ये प्रसिध्द केले जाईल.

खालील संकेतस्थळावरुन ई-निविदाची सर्व माहीती उपलब्ध आहे.
1) www.mahapwd.com
2) http :// mahatenders.gov.in

जा.क्रं. इशवि/निलि/७५९८२
कार्यकारी अभियंता
इलाखा शहर विभाग, मुंबई यांचे कार्यालय,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
२ रा मजला, बांधकाम भवन,
२५ मर्झबान रोड, फोर्ट,
मुंबई- ४०० ००१.
Email : presidency.ee@mahapwd.gov.in
दिनांक : २७/११/२०२४

(व्ही. ए. पाटसकर)
कार्यकारी अभियंता,
इलाखा शहर विभाग, मुंबई.

डीजीआयपिआर/ २०२४-२०२५/४८२१



**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा. बां.) विभाग,**
प्रशासकीय इमारत, १ ला मजला, भवन्स कॉलेज जवळ, दादाभाई रोड, अंधेरी (प.), मुंबई- ४०००५८.
E-mai -northmumbai.ee@mahapwd.com दुरध्वनी क्रमांक .०२२-२६२३१९६४ फॅक्स - २६२०५७८८

**निविदा सुचना क्र. ३५ सन २०२३-२०२४**

महाराष्ट्र राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग, दादाभाई मार्ग, भवन्स कॉलेज जवळ अंधेरी (प) मुंबई-४०००५८ (दुरध्वनी/फॅक्स क्रमांक- २६२३१९६४/२६२०५७८८) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडुन योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडुन खालील कामाकरीता ब-१ नमुन्यातील निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र दिनांक- २७/११/२०२४ ते दिनांक- ०४/१२/२०२४ कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग, मुंबई यांचे कार्यालयात उपलब्ध असतील. तसेच दिनांक- ०५/१२/२०२४ दुपारी १७.०० वाजेपर्यंत निविदा स्विकारण्यात येतील व शक्य झाल्यास त्याच दिवशी निविदा उघडण्यात येतील निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग, मुंबई यांनी राखून ठेवला आहे.

| अ.क्र | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | शासकिय वसाहत वांद्रे येथील इमारत क्र- ब-२४ ते ब-२५ येथील इमारतींचे पाडकाम करणे | रु.७८४७७०/- |
| २ | शासकिय वसाहत वांद्रे येथील इमारत क्र- ब-२६ ते ब-२७ येथील इमारतींचे पाडकाम करणे | रु.७८४७७०/- |
| ३ | शासकिय वसाहत वांद्रे येथील इमारत क्र- ब-२८ ते ब-२९ येथील इमारतींचे पाडकाम करणे | रु.७८४७७०/- |
| ४ | शासकिय वसाहत वांद्रे येथील इमारत क्र- ब-३० ते ब-३१ येथील इमारतींचे पाडकाम करणे | रु.७८४७७०/- |
| ५ | शासकिय वसाहत वांद्रे येथील इमारत क्र- ब-३२ ते ब-३३ येथील इमारतींचे पाडकाम करणे | रु.७८४७७०/- |
| ६ | शासकिय वसाहत वांद्रे येथील इमारत क्र- ब-५६ ते ब-५७ येथील इमारतींचे पाडकाम करणे | रु.६८८५६८/- |
| ७ | शासकिय वसाहत वांद्रे येथील इमारत क्र- ब-५८ ते ब-५९ येथील इमारतींचे पाडकाम करणे | रु.६८८५६८/- |
| ८ | शासकिय वसाहत वांद्रे येथील इमारत क्र- ब-६० ते ब-६१ येथील इमारतींचे पाडकाम करणे | रु.६८८५६८/- |
| ९ | शासकिय वसाहत वांद्रे येथील इमारत क्र- ब-६२ ते ब-६३ येथील इमारतींचे पाडकाम करणे | रु.६८८५६८/- |
| १० | शासकिय वसाहत वांद्रे येथील इमारत क्र- ब-६४ ते ब-६५ येथील इमारतींचे पाडकाम करणे | रु.६८८५६८/- |
| ११ | शासकिय वसाहत वांद्रे येथील इमारत क्र- ब-६६ ते ब-६७ येथील इमारतींचे पाडकाम करणे | रु.६८८५६८/- |
| १२ | शासकिय वसाहत वांद्रे येथील इमारत क्र- ब-६८ ते ब-६९ येथील इमारतींचे पाडकाम करणे | रु.६२३३८०/- |
| १३ | शासकिय वसाहत वांद्रे येथील इमारत क्र ब ७० ते ब ७१ येथील इमारतींचे पाडकाम करणे | रु.६२३३८०/- |
| १४ | शासकिय वसाहत वांद्रे येथील इमारत क्र- ब-७२ ते ब-७३ येथील इमारतींचे पाडकाम करणे | रु.६२३३८०/- |
| १५ | शासकिय वसाहत वांद्रे येथील इमारत क्र- ब-७४ ते ब-७५ येथील इमारतींचे पाडकाम करणे | रु.६२३३८०/- |
| १६ | शासकिय वसाहत वांद्रे येथील इमारत क्र- ब-७६ ते ब-७७ येथील इमारतींचे पाडकाम करणे | रु.६२३३८०/- |
| १७ | शासकिय वसाहत वांद्रे येथील इमारत क्र- ब-७८ ते ब-७९ येथील इमारतींचे पाडकाम करणे | रु.६२३३८०/- |
| १८ | शासकिय वसाहत वांद्रे येथील इमारत क्र- ब-८० ते ब-८१ येथील इमारतींचे पाडकाम करणे | रु.६२३३८०/- |
| १९ | शासकिय वसाहत वांद्रे येथील इमारत क्र- ब-८२ ते ब-८३ येथील इमारतींचे पाडकाम करणे | रु.६२३३८०/- |
| २० | शासकिय वसाहत वांद्रे येथील इमारत क्र- ब-८४ ते ब-८५ येथील इमारतींचे पाडकाम करणे | रु.६२३३८०/- |
| २१ | शासकिय वसाहत वांद्रे येथील इमारत क्र- ब-८६ ते ब-८७ येथील इमारतींचे पाडकाम करणे | रु.६२३३८०/- |

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता , उत्तर मुंबई(सा.बां) विभाग, अंधेरी (प.) मुंबई ५८.यांनी राखून ठेवला आहे.अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

जा.क्र.काअ/उमुंवि/निविदा/ ७०५५८
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
उत्तर मुंबई(सा.बां) विभाग,
प्रशासकीय इमारत, १ ला मजला,
भवन्स कॉलेजजवळ, दादाभाई मार्ग,
अंधेरी (प.) मुंबई ५८.
दिनांक :- २५/११/२०२४

कार्यकारी अभियंता,
उत्तर मुंबई(सा.बां) विभाग,
अंधेरी (प.) मुंबई ५८.

डीजीआयपीआर/ २०२४-२०२५/४७४८



**महाराष्ट्र शासन**
इलाखा शहर विभाग, (सा.बां.)
**ई -निविदा सुचना क्र. ५८ सन २०२४-२०२५**

कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई (दुरध्वनी क्रंमांक-२२०१६९७५ /२२०१६९७७) हे सक्षम व अनुभवी कंत्राटदाराकडून खालील कामाकरीता ब-१ नमुन्यातील निविदा ई- निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) मागवित आहेत निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम रु. लक्ष |
|---|---|---|
| १ | चर्चगेट मुंबई येथील ए-रोड वरील तुषार इमारत व बी-रोड वरील सागर इमारतीचे नुतनीकरण करणे. | ५४९.३१ |

ई-निविदा उपलब्ध कालावधी- दि. २.१२.२०२४ ते दि. २६.१२.२०२४ पर्यंत.

निविदा पूर्व बैठक - दि. १२.१२.२०२४ (बैठकिचे ठिकाण मुख्य अभियंता यांचे कार्यालय ४ बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई- ४०० ००१ वेळ : ३.०० वाजता)

ई-निविदा उघडणे- दि. २७.१२.२०२४ रोजी दुपारी ३.०० वाजता
निविदा सुचने मध्ये काही बदल/सुधारणा करावयाची असल्याचे शुध्दीपत्रक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात येणार नाही. त्याबत सर्व बदल ऑनलाईन निविदा प्रक्रियेमध्ये प्रसिध्द केले जाईल.
खालील संकेतस्थळावरुन ई-निविदाची सर्व माहीती उपलब्ध आहे.
1) www.mahapwd.com
2) http :// mahatenders.gov.in

जा.क्रं. इशवि/निलि/ ७५९८०९
कार्यकारी अभियंता
इलाखा शहर विभाग, मुंबई यांचे कार्यालय,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
२ रा मजला, बांधकाम भवन,
२५ मर्झबान रोड, फोर्ट,
मुंबई - ४०० ००१.
Email : presidency.ee@mahapwd.gov.in
दिनांक : २७/११/२०२४

(व्ही. ए. पाटसकर)
कार्यकारी अभियंता,
इलाखा शहर विभाग, मुंबई.

डीजीआयपीआर/ २०२४-२०२५/४८२०


Printed, published and owned by **Rakesh Shankar Gore** and printed at Somani Printing Press Unit No. 4, Ground Floor, N.K. Industrial Estate, Off. Aarey Road, Near Parvasi Ind Estate, Gate No.2, Goregaon(E), Mumbai- 400063 Maharashtra and published at 105-A-Wing, 1st Floor, Maa-Ashapura Chs Ltd. Near Gurunanak Hospital, BKC Link Road, Bandra (East), Mumbai-400051 Maharashtra. **Editor- Rakesh Shankar Gore.**
• Mail id : maharashtracrimetimes@gmail.com, Contact No- 9892386748 / 9803386748, Website : www.maharashtracrimetimes.com

# ठाणे जिल्हा रुग्णालयातील एसएनसीयू कक्ष कमी वजनाच्या बाळांसाठी जीवनदायी!

■ **ठाणे : तृप्ती गोरे**

खरतर ४०० ग्रॅम वजनाच्या बाळावर उपचार हे आमच्यासाठी आव्हान होते. शहापूरच्या आदिवासी भागातून आलेल्या एका महिलेने ४०० ग्रॅम वजनाच्या बाळाला ठाणे जिल्हा रुग्णालयात जन्म दिला. मुळातच या मातेला पुरेसा पोषण आहार मिळाला नसल्याने बाळाला वाचवणे हे मोठे आव्हान होते. जवळपास दीड महिना बाळावर एसएनसीयूत (विशेष नवजात बालक काळजी कक्ष) उपचार करत होतो...आज बाळ व आई सुखरूप आपल्या घरी परत गेले असे सांगताना डॉ सुरेश वानखेडे यांच्या चेहेर्यावर एक समाधान दिसत होतेष्ठ अशा कमी वजनाच्या अनेक बाळांवर ठाणे जिल्हा रुग्णालयात यशस्वी उपचार होत असून कमी वजनाच्या नवजात बाळांसाठी रुग्णालयातील एसएनसीयू जीवनदायी बनले आहे.

आर्थिक परिस्थिती नसल्यामुळे ठाणे जिल्ह्यातील वेगवगळया ठिकाणाहून प्रसुतीसाठी शेकडो महिला ठाणे जिल्हा रुग्णालयात दाखल होतात. येथे प्रसुतीकक्षात असलेले खाटा आणि बाळंतपणासाठी येणार्या महिलांची संख्या यांचे प्रमाण कमालीचे व्यस्त आहे. परिणामी प्रसुतीसाठी येणार्या अनेक मातांना जमिनीवर गादीवर झोपावे लागते. प्रसुतीसाठी येणार्या मातांची संख्या लक्षात घेता डॉक्टर व परिचारिकांचे प्रमाण कमालीचे व्यस्त आहे. या सर्वांचा ताण येथील डॉक्टरांसह व्यवस्थेवर येत असून अनेकदा रुग्णांच्या नातेवाईकांकडून तणाव निर्माण केला जात असल्याचे येथेल डॉक्टरांचे म्हणणे आहे.

यातील सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे प्रसूतीनंतर कमी वजनाची बाळ जन्मला आल्यावर त्यांची काळजी घेणं हे डॉक्टरांसाठी सर्वात मोठे आव्हान असते. ठाणे जिल्हा रुग्णालयातील प्रसुतीगृह तसेच एसएनसीयू अनेक खाजगी नर्सिंग होमपेक्षा चांगले असून अत्यंत आधुनिक सोयीसुविधा येथे उपलब्ध असल्याचे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ कैलास पवार यांनी सांगितले. आमच्याकडे केवळ बाळाची व आईचीच काळजी घेतली जात नाही तर बरोबर येणार्या नातावाईकांना साकाळ संध्याकाळच्या



जेवणाचीही विनामूल्या व्यवस्था केली जाते,असेही डॉ पवार यांनी सांगितले.

गेल्या ११ महिन्यात एक किलो पेक्षा कमी वजनाची ३६ मुलं प्रसूतीगृहात जन्मला आल्याचे डॉ वानखेडे म्हणाले येथील एसएनसीयू कक्ष बाळांसाठी जीवनायी असून, काही अपवाद वगळता बहुतेक कमी वजनाच्या बाळांची प्रकृती सुधारून आई आणि बाळ घरी सुखरूप जात आहेत.

ठाणे सिव्हील रुग्णालयात चांगल्या उपचारांबरोबर अवघड शस्त्रक्रिया देखील यशस्वी होत असून, रुग्णालयातील प्रसूतीगृह तितकाच क्षमतेने काम करताना दिसून येतो. प्रसूतीसाठी ठाणे शहर, ग्रामीण, दुर्गम आदिवासी भाग आणि पालघर जिल्ह्यातील गर्भवती महिला प्रसूतीसाठी सिव्हील रुग्णालयात येत असतात. काही वेळा इमर्जन्सी असणाऱ्या जोखमीच्या प्रसूती साठी गर्भवती महिला रुग्णालयात दाखल होत असतात. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. कैलास पवार आणि अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. धीरज महांगडे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रसूतीगृहात जन्माला आलेल्या प्रत्येक बाळाची विशेष काळजी घेतली जात असल्याची माहिती वरिष्ठ बालरोग तज्ज्ञ डॉ. सुरेश वानखेडे यांनी दिली. प्रसूती गृहात अत्याधुनिक साधन असून, एखाद बाळ कमी वजनाचे जन्माला आलेच तर त्याच्यासाठी एसएनसीयू कक्ष या ठिकाणी ठेवला आहे. आई आणि बाळाला कोणता त्रास होणार नाही या दृष्टीने या कक्षात सर्व सोयी ठेवण्यात आल्या आहेत. एक किलो पेक्षा कमी वजनाचे बाळ व्यवस्थित होऊन घरी जात नाही तो पर्यंत रुग्णालयाच्या एसएनसीयूमधे काळजी घेतली जाते. यामध्ये डॉ. राहुल गुरव, डॉ. शैलेश गोपनपल्लिकर, डॉ. प्रकाश बोरुळकर, वरिष्ठ परिचारिका सारिका शेणेकर, शीतल जठार आदी अथक परिश्रम करतात. एक किलो पेक्षा कमी वजनाचे बाळ जन्माला आल्यावर या बाळाची प्रतिकार शक्ती कमी असते. याबरोबर कावीळ, श्वसनत्रास, इन्फेक्शन होण्याची शक्यता असते. त्यामुळे अशा बाळांचा सांभाळण्याची मोठी जबाबदारी आमच्यावर असते. मात्र अस असले तरी,एसएनसीयू मधिल आमचे बालरोग तज्ज्ञ, वैद्यकिय अधिकारी आणि नर्सिंग स्टाफ़ आई आणि बाळाची आपुलकीने काळजी घेत असतात.

## पालघर जिल्ह्यातील 'या' रुग्णालयाला अवयव प्रत्यारोपणाची मंजूरी; पहिले स्वतंत्र अवयव प्रत्यारोपण यशस्वी

■ **वसई : सुचिता देशमुख**

वसईतील एका मेंदूमृत (ब्रेन डेड) महिलेच्या अवयव प्रत्यारोपणाची शस्त्रक्रिया वसईत यशस्वी झाली असून त्यामुळे ६ जणांना नवसंजीवनी आहे. या महिलेच्या दोन्ही किडन्या आणि लिव्हर प्रत्योरोपित करण्यात आल्या आहेत. त्वचा बर्न सेंटर आणि डोळ्यांचे दोन कॉर्निऱ्या सुरक्षितपणे सहियारा आय बँकेत सुपूर्द करण्यात आले आहेत. पालघर जिल्ह्यातील रिध्दी विनायक रुग्णालय हे अवयव प्रत्यारोपण करणारे पहिले रुग्णालय ठरले आहे. वसई राहणारी एक ५० वर्षीय महिला घरात काम करताना बेशुद्ध पडली. नालासोपारा येथील रिद्धी विनायक रुग्णालयाने तिच्या मेंदूवर शस्त्रक्रिया करून तिला वाचवण्याचा प्रयत्न केला. मात्र ती मेंदूमृत (ब्रेन डेड) झाली. रिद्धी विनायक रुग्णालयाचे समन्वयक सागर वाघ आणि अवयवदान चळवळीचे पुरुषोत्तम पवार यांनी महिलेच्या कुटुंबियांना अवयवदानाचे महत्व पटवून दिले. त्यानंतर महाराष्ट्र शासनाच्या विभागीय प्रत्यारोपण समन्वय समितीच्या नियमाप्रमाणे अवयव प्रत्यारोपणाची प्रक्रिया करण्यात आली. या महिलेची एक किडनी




केईएम रुग्णालयात तर दुसरी किडनी अपोलो रुग्णालयातील रुग्णावर प्रत्यारोपित झाली. लिव्हर ठाण्याच्या जुपिटर रुग्णालयात प्रत्यारोपित करण्यात आले. ऐरोली येथील नॅशनल बर्न सेंटरने त्वचा स्वीकारली तर डोळ्यांचे दोन कॉर्निऱ्या सहियारा आय बँकेत सुपूर्द करण्यात आले. ही प्रक्रिया दोन दिवस सुरू होती. या महिलेच्या अवयवदानामुळे सहा जणांना नवजीवन मिळाले. पालघर जिल्ह्यातील एकाही रुग्णालयाला अवयव प्रत्यारोपणाची मंजूरी नव्हती. त्यामुळे कुणाला अवयवदान करायचे असेल तर मुंबईतील रुग्णालयात करावे लागत होते. नालासोपारा येथील रिध्दीविनायक रुग्णालयाला नुकतीच शासनाकडून अवयवदान प्रत्यारोपणाची मंजुरी मिळाली. त्यानंतर रुग्णालयात झालेले हे पहिले अवयव प्रत्यारोपण आहे. या संपूर्ण अवयवदान प्रक्रियेत रिद्धीविनायक हॉस्पिटलचे डॉक्टर व्यंकट गोयल, डॉ प्रणय ओझा, डॉ निमेश जैन, समन्वयक सागर वाघ आदींनी मोलाची भूमिका बजावली.

## अनधिकृत इमारतींवरील कारवाई थंडावली, राडारोडा आणि मातीच्या ढिगाऱ्यामुळे अडथळा

■ **वसई : प्रतिनिधी**

नालासोपाऱ्यातील ४१ इमारतींवरील कारवाई दुसऱ्या दिवशी थंडावली आहे. गुरुवारी ७ इमारती पाडल्यानंतर मोठ्या प्रमाणात राडारोडा जमा झाल्याने कारवाईत अडथळा निर्माण झाला आहे. त्यामुळे दिवसभर हा राडारोडा हटविण्याचे काम सुरू होते.

नालासोपारा पूर्वेच्या आचोळे येथे क्षेपणभूमी आणि सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पासाठी आरक्षित असलेल्या जमिनीवर भूमाफियांनी ४१ अनधिकृत इमारती बांधल्या आहेत. या इमारतीत २ हजारांहून अधिक कुटुंबे राहत आहेत. मात्र सर्वोच्च न्यायालयाने या इमारती बेकायदेशीर असल्याचे ठरवून त्यावर कारवाई करण्याचे निर्देश



वसई विरार महपालिकेला दिले होते. त्यानुसार गुरुवारपासून पोलीस बंदोबस्तात कारवाईला सुरुवात करण्यात आली होती.

पहिल्या दिवशी एकूण ७ इमारती पाडण्यात आल्या. या इमारती अतिधोकादायक (सी १) वर्गातील होत्या. त्यामुळे तेथील रहिवशांना बाहेर काढून कारवाई करण्यात आली होती. शुक्रवारी पुढील इमारतींवर कारवाई करण्यात येणार होती. मात्र शुक्रवारी कारवाई झाली नाही. पहिल्या दिवशी ७ इमारती पाडण्यात आल्या होत्या. त्याचा राडारोडा मोठ्या प्रमाणावर जमा झाला आहे. त्यामुळे कारवाईसाठी अडथळा निर्माण झाल्याने शुक्रवारची कारवाई स्थगित करण्यात आली आहे. राडारोडा उचलण्याचे काम सध्या सुरू आहे. तो उचलून परिसर मोकळा झाल्यानंतर पुढील इमारतींवर कारवाई केली जाईल, असे पालिकेचे उपायुक्त (अतिक्रमण) दिपक सावंत यांनी सांगितले.

## रस्त्यावर खाद्यपदार्थांची विक्री आणि वाहतुकीस अडथळा, विशेष मोहिमेत ५० जणांविरोधात कारवाई

■ **वसई : विशेष प्रतिनिधी**

रस्त्याच्या कडेला वर्दळीच्या ठिकाणी खाद्यपदार्थांची विक्री करणारे तसेच गाड्या ठेवून वाहतुकीस अडळथा निर्माण करणाऱ्यांच्या विरोधात पोलिसांनी कारवाई सुरू केली आहे. पेल्हार, वालीव पोलिसांनी दोन दिवसांत केलेल्या कारवाईत ५० जणांविरोधात गुन्हे दाखल केले आहेत. शहरातील नागरिक अरुंद रस्ते, त्यावरील



फेरिवाल्यांचे अतिक्रमण यामुळे त्रस्त आहेत. रस्त्याच्या कडेला खाद्यपदार्थ विक्रेत स्टॉल लाऊन विक्री करत असतात. ते स्वंयपाकासाठी गॅसचा वापर करतात. मात्र वर्दळीच्या आणि रहदारीच्या ठिकाणी अशा प्रकारे विनापरवाना गॅसचा वापर करणे धोकादायक असते. याशिवाय औद्योगिक क्षेत्रात रस्त्याच्या कडेला वाहने उभी केली जातात. त्यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होऊन अपघाताची शक्यता असते. अशा विक्रेते आणि वाहनांच्या विरोधाता मिरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयाने कारवाई सुरू केली आहे. दोन दिवस चाललेल्या या कारवाईत ५० जणांविरोधात कलम २८५ अन्वये गुन्हे दाखल केले आहेत.

## आरक्षित भूखंडावर अतिक्रमण, घणसोलीत रुग्णालयासाठी आरक्षित जमिनीवर भाजी विक्रेत्यांचे बस्तान

■ **नवी मुंबई : धनश्री सट्टा**

नवी मुंबई महानगरपालिकेने रस्त्यावरील फेरीवाल्यांचे अतिक्रमण हटविण्यासाठी विशेष नियोजन सुरू केले आहे. तसेच प्रत्येक विभागात अधिकृत भाजी मंडईही सुरू केली आहे. असे असले तरी घणसोली सेक्टर-७ येथील रुग्णालयासाठी आरक्षित असणार्या भूखंडावर भाजी



विक्रेत्यांनी अनधिकृतपणे बस्तान मांडून अतिक्रमण केले आहे. नवी मुंबई महानगरपालिका अनधिकृतपणे भाजी विक्री करणाऱ्यांवर कारवाई करते मग या भूखंडावर भाजी विक्रेत्यांनी केलेल्या अतिक्रमण कारवाईकडे दुर्लक्ष करीत आहेत का, असा प्रश्न नागरिकांमधून उपस्थित होत आहे. सिडकोने शहराची निर्मिती करत असताना अनेक भूखंड आरोग्य,शाळा, क्रीडा, उद्याने- मैदाने, नागरी विकास प्रकल्प इत्यादी सामाजिक उपक्रमांसाठी आरक्षित ठेवण्यात आले होते. हे भूखंड कालांतराने महापालिकेकडे हस्तांतर झाले. पालिकेने या भुखंडांवर आरक्षणाचे फलक देखील उभारले आहेत. मात्र या भुखंडाचा वापर न झाल्याने पालिकेने आरक्षित केलेल्या भुखंडावर फेरीवाले, खाद्यपदार्थ विक्रेत्यांनी अतिक्रमण केले आहे. पावसाळयात या जमिनीवर मोठया प्रमाणावर झाडेझुडपेही वाढतात. भुखंडावर लावण्यात आलेल्या लोखंडी जाळया आणि गेट हा गंजल्याने काढून टाकण्यात आले आहेत. त्यातच या ठिकाणी रस्त्यावर बसणार्या भाजी विक्रेत्यांनी या मैदानावर अतिक्रमण केले आहे. भाजी विक्रेते, कांदा बटाटा विक्रेत्यांनी मागील काही महिन्यांपासून विनापरवाना व्यवसाय सुरू केला आहे.

## डोंबिवलीतील रिअल इस्टेट कंपनीच्या सदस्यांकडून मुंबईतील व्यावसायिकाची १० कोटीची फसवणूक

■ **डोंबिवली : आकाश कांबळे**

**डोंबिवली जवळील ठाकुर्लीतील एका रिअल इस्टेट कंपनीच्या सदस्यांनी डोंबिवली जवळील खोणी भागातील एका जमिनीची बनावट कागदपत्रे तयार केली. ही कागदपत्रे खरी आहेत असे दाखवून मुंबईतील एक व्यावसायिक आणि त्याच्या मित्राला विक्री केली. या जमीन विक्रीच्या तडजोडीच्या व्यवहातून लोअर परेलमधील एका उच्चभ्रू गृहसंकुलातील सदनिका आपणास स्वस्तात घेऊन देतो असे सांगून रिअल इस्टेटच्या सदस्यांनी दोन जणांची १० कोटी ४० लाख रूपयांची फसवणूक केली आहे.**

सन २०२१ ते २०२३ या कालावधीत हा फसवणुकीचा प्रकार घडला आहे. गेल्या पाच दिवसापूर्वी या फसवणूक प्रकरणी मुंबईतील कांदिवली परिसरात राहणाऱ्या एका व्यावसायिकाने रामनगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. पोलिसांनी तक्रारदाराच्या तक्रारीवरून




डोंबिवली जवळील ठाकुर्लीतील एका रिअल इस्टेट कंपनीच्या चार सदस्यांसह इतरांवर गुन्हे दाखल केले आहेत. पोलिसांच्या प्राथमिक तपासणी अहवालात तक्रारदाराने दिलेली माहिती अशी की, ठाकुर्लीतील रिअल इस्टेट कंपनीच्या सदस्यांनी डोंबिवली जवळील खोणी येथील एका जमिनीची बनावट कागदपत्रे तयार केली. ही कागदपत्रे सन २००७ च्या मुद्रांक शुल्क दस्तऐवजावर तयार करण्यात येऊन, ही कागदपत्रे खूप जुनी असल्याचे मुंबईतील जमीन खरेददारांना दाखविण्यात आले. या जमिनीचा मूळ मालक रिअल इस्टेटमधील एक सदस्य नसताना, ते या जमिनीचे मूळ मालक आहेत असे दस्तऐवजावर दाखविण्यात आले. ही जमीन रिअल इस्टेच्या चार आणि इतर सदस्यांनी मुंबईतील कांदिवली भागातील एक व्यावसायिक आणि त्यांच्या मित्राला विक्री केली. त्याच बरोबर या जमिनीच्या तडजोडीच्या व्यवहारातून या जमिनीबरोबर रिअल इस्टेटच्या सदस्यांनी व्यावसायिकांना आम्ही तुम्हाला लोअर परेल येथील एका उच्चभ्रू वसाहतीच्या गृहसंकुलात स्वस्त दरात सदनिका घेऊन देतो, असे खोटे आश्वासन दिले.

# नवी मुंबईत ५२७ धोकादायक इमारती

■ **नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रात असलेल्या इमारतींचे सर्वेक्षण करण्यात आले असून शहरात ५२७ धोकादायक इमारती असून ३१ मार्च २०२५ पूर्वी या इमारतीचे संरचनात्मक परिक्षण करुन अहवाल पालिकेला सादर करण्याचे आवाहन नवी मुंबई महापालिकेतर्फे संबंधित इमारतीमधील नागरीकांना करण्यात आले आहे. नवी मुंबई महापालिकेने या वर्षासाठी सर्वेक्षण करण्यात आले असून सर्वेक्षणानंतर शहरात ५२७ इमारती धोकादायक इमारती म्हणून घोषित करण्यात आलेल्या आहेत. ज्या इमारतींचा वापर सुरू होऊन ३० वर्षापेक्षा अधिक काळ झाला आहे, अशा इमारतींचे नवी मुंबई महानगरपालिकेकडे नोंदणी केलेल्या बांधकाम अभियंत्याकडून किंवा संरचना अभियंत्याकडून संरचना परीक्षण अर्थात स्ट्रक्चरल ऑडीट करून घेणे अनिवार्य आहे. ३० वर्षापेक्षा जास्त काळ इमारतीचा वापर किंवा इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झाले त्या इमारतीचा वापर सुरु झाला अशा दिवसापासून मोजावयाचा आहे.



नेमलेल्या संरचना अभियंत्याने शिफारशी केलेली दुरूस्तीची कामे पूर्ण झाल्याचे व ते बांधकाम सुस्थितीत असल्याचे प्रमाणपत्र नवी मुंबई महानगरपालिकेकडे सादर करावे लागणार आहे.याबाबत टाळाटाळ करणाऱ्यांस २५ हजार रुपये अथवा सदर मिळकतीच्या वार्षिक मालमत्ता कराची रक्कम यापैकी जी जास्त असेल तितक्या रक्कमेचा दंड ठोठवावयाची तरतूद नियमावलीनुसार करण्यात आली आहे. ३० वर्षापेक्षा जास्त काळ झालेल्या इमारतीच्या संरचनात्मक परीक्षणाचा अहवाल ३१ मार्च २०२५ पूर्वी संबाधित विभागाचे सहाय्यक आयुक्त तथा विभाग अधिकारी किंवा सहाय्यक संचालक नगररचना, नवी मुंबई महानगरपालिका यांच्याकडे सादर करायचा आहे. धोकादायक झालेल्या इमारतींचा, घरांचा वापर केल्यामुळे जिवित व वित्त हानी होऊ शकते म्हणून नागरिकांकडून धोकादायक इमारतींचा, घराचा रहिवास, वापर तात्काळ थांबविण्यात यावा असे आवाहन नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

## चौकांचे कॉंक्रीटीकरण अर्धवटच, पावसाळयानंतरही कामे जैसे थेच

■ **नवी मुंबई (प्रतिनिधी)** - पुरेशी रहदारी नसतानाही नवी मुंबईत काही आडवाटेला असलेल्या चौकांच्या परिसरातील रस्त्यांची कॉंक्रीटीकरणाची कामे हाती घेत वादात सापडलेल्या नवी मुंबई महापालिकेच्या अभियांत्रिकी विभागाने पावसाळा संपला तरी बऱ्याचशा चौकांमधील कामे अर्धवट अवस्थेत ठेवल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. पावसाळयात या कामांचा प्रवाशांना त्रास होत असल्याने ही कामे थांबिवण्यात आली होती. परंतु पावसाळा झाल्यानंतरही जवळपास १० चौकांची कामे ठप्प झाली आहेत.

**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग, यांचे कार्यालय**
**Email :- integratedmumbai.ee@mahapwd.com**
**दुरध्वनी क्र. २२०१६९७४ फॅक्स क्र. २२०१६९७६**
**ई-निविदा सुचना क्र. ३१ सन २०२४-२५**

कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां) विभाग, फोर्ट, मुंबई-०१ (दूरध्वनी क्र. २२०१६९७४/७६) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत/इतर कंत्राटदारांकडून खालील कामाकरीता "ब-१" नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां) विभाग, फोर्ट, मुंबई, यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम रु. |
|---|---|---|
| १ | सेंट जॉर्जेस हॉस्पिटल, मुंबई येथील डायलिसिस वॉर्डचे अपग्रेडेशन करणे. | २,४४,१९,८५४/- |

(एकुण ०१ कामे)

ई-निविदा आलेख कालावधी : दिनांक ०२/१२/२०२४ सकाळी १०.३० पासून ते दिनांक १६/१२/२०२४ रोजी १५.०० पर्यंत

निविदा पूर्व बैठक : दिनांक १०/१२/२०२४ रोजी दुपारी १५.०० वाजता
मा. अधीक्षक अभियंता,
बांधकाम भवन, ५ वा मजला, २५ मर्झबान रोड,
फोर्ट, मुंबई-४०० ००१

ई-निविदा उघडणे (शक्य झाल्यास) : दिनांक १९/१२/२०२४ रोजी १५.०५ वाजता

खालील संकेतस्थळावरुन ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.
१. http://mahapwd.com २. http://mahatenders.gov.in
(सदर निविदेसूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेब साईटवरती कळविण्यात येईल.)
३. कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां) विभाग, फोर्ट, मुंबई कार्यालयातील सूचना फलक.

जा.क्र.एघ(सा.बां.)/निविदा/ ५७७६
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग,
बांधकाम भवन, २ रा मजला,
२५ मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई-४०० ००१.
दुरध्वनी क्र. ०२२-२२०१६९७४/७६
दिनांक : २८/११/२०२४

कार्यकारी अभियंता,
एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग.
फोर्ट, मुंबई.

डीजीआयपीआर/ २०२४-२०२५/४८४७

## डोंबिवलीत मालमत्ता कर थकविणाऱ्या क्रिटीकल केअर सेंटरसह पाच गाळे सील, पालिकेच्या ग प्रभागाची कारवाई

■ **डोंबिवली : सतिश सोनावणे**

वारंवार नोटिसा देऊनही मालमत्ता कराची थकबाकी न भरणाऱ्या कल्याण डोंबिवली पालिकेच्या येथील ग प्रभाग हद्दीतील वाणीज्य वापर असलेल्या पाच आस्थापना ग प्रभागाचे साहाय्यक आयुक्त संजयकुमार कुमावत यांच्या मार्गदर्शनाखाली मालमत्ता कर विभागाच्या




पथकाने पोलीस बंदोबस्तात शुक्रवारी सील केल्या. या मालमत्ताधारकांकडे एकूण १६ लाख ५४ हजार ९७७ रूपयांची थकबाकी आहे. पाच गाळे सील करण्यात आलेल्या थकबाकीदारांच्या यादीत डोंबिवली पूर्वेतील नांदिवली रोडवरील गोविंद राजाराम पाटील यांच्या राजाराम निवासमधील पाच दुकान गाळ्यांचा समावेश आहे. या गाळ्यांचे मालक असलेल्या गोविंद पाटील यांच्याकडे मालमत्ता कराची ११ लाख ३७ हजार २३४ रूपयांची थकबाकी आहे. त्यांना ही थकित रक्कम भरणा करण्यासाठी पालिकेने वेळोवेळी नोटिसा बजावल्या होत्या. त्यांच्याकडून ही रक्कम भरणा न करण्यात आल्याने त्यांचे व्यापारी गाळे सील करण्याची कारवाई करण्यात आली, अशी माहिती ग प्रभागाचे साहाय्यक आयुक्त संजयकुमार कुमावत यांनी दिली. मानपाडा रस्त्यावरील लक्ष्मी निवास येथील क्रिटीकल केअर सेंटर यांचीही पालिकेकडे मालमत्ता कराची सात लाख १६ हजार ७४३ इतक रक्कम थकित होती. त्यांनाही पालिकेने वारंवार नोटिसा पाठवून कर भरणा करण्याची ताकीद दिली होती. त्यांनी ही रक्कम वेळेत भरणा केली नाही. त्यामुळे त्यांचे क्रिटीकल केअर सेंटर सील करण्यात आले, असे साहाय्यक आयुक्त कुमावत यांनी सांगितले. पालिकेच्या जनसंपर्क विभागाने प्रसिध्द करण्यात आलेल्या प्रसिध्दी पत्रकात आस्थापना सील करण्याच्या कारवाईची सविस्तर माहिती देण्यात आली आहे.

# कुलाब्यातील प्रकल्पाला पालिकेची स्थगिती?




■ मुंबई : राकेश गायकवाड

दक्षिण मुंबईतील कुपरेज मैदानात लहान मुलांसाठी हॉर्स कॅरोसेल अर्थात फिरते चक्र (मेरी गो राऊंड) तयार करण्याच्या प्रकल्पाला पालिका प्रशासनाने स्थगिती दिल्याचा आरोप भाजपचे माजी नगरसेवक मकरंद नार्वेकर यांनी केला आहे. माजी विधानसभा अध्यक्ष व भाजपचे आमदार राहुल नार्वेकर यांच्या संकल्पनेतून आलेल्या चार प्रकल्पांना आतापर्यंत पालिका प्रशासनाने स्थगिती दिल्याचा आरोपही त्यांनी केला असून पालिका प्रशासन हे कुलाबा विरोधी असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. दरम्यान, पालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी हे सर्व आरोप फेटाळून लावले आहेत.

कुलाबा विधानसभा मतदारसंघ हा गेल्या काही महिन्यांपासून पालिका प्रशासन विरुद्ध नार्वेकर बंधू या वादात सापडला आहे. आपण सुचवलेल्या प्रकल्पांना पालिका प्रशासन स्थगिती देण्यात येत असल्याचा आरोप मकरंद नार्वेकर यांनी केला आहे. आतापर्यंत अशाच चार प्रकल्पांना प्रशासनाने स्थगिती दिली असल्याचा आरोप नार्वेकर यांनी केला आहे. काळा घोडा, कुलाबा कॉजवे, रिगल जंक्शन आणि गेटवे ऑफ इंडिया नंतर कुपरेज गार्डनच्या प्रकल्पाला प्रशासनाने विरोध केल्याचा आरोप नार्वेकर यांनी केला आहे. तशा आशयाचे पत्र मकरंद नार्वेकर यांनी पालिका आयुक्त भूषण गगराणी यांना दिले आहे. नार्वेकर यांनी महापालिका आयुक्त भूषण गगराणी यांना लिहिलेल्या पत्रात असे म्हटले आले की, कुलाबा येथील कूपरेज मैदानातील कॅरोसेल हा पर्यटकांसाठी अनुकूल उपक्रम आहे. हे मैदान ऐतिहासिकदृष्ट्या घोडा गार्डन म्हणून ओळखले जात होते. याठिकाणी होणारी घोडेस्वारी काही वर्षांपूर्वी बंद करण्यात आली. कूपरेज मैदानाला पुन्हा गतवैभव प्राप्त करून देण्यासाठी ही योजना तयार करण्यात आली होती. पालिकेचे धोरण हे कुलाब्याला पर्यटन केंद्र बनवण्याच्या मार्गात अडथळा ठरत असल्याचा गंभीर आरोपही त्यांनी केला आहे. हॉर्स कॅरोसेल या प्रकल्पाला बीएमसीच्या मेकॅनिकल आणि इलेक्ट्रिकल विभागाकडून मंजुरी देण्यात आली आहे. पण आता काळा घोडा, कुलाबा कॉजवे, रिगल जंक्शन आणि गेटवे ऑफ इंडिया प्रकल्पांप्रमाणे हा प्रकल्पही स्थगित करण्यात आला आहे. पालिकेने शंभर कोटींचे प्रकल्प मंजूर केले आहेत. ज्यांच्या आर्थिक व्यवहार्यतेबाबत शंका आहे. पण, महापालिका फक्त दोन कोटी रुपयांच्या योजनेत मात्र लहान मुलांचा आनंद आणि हसू हिरावून घेते आहे, असाही आरोप केला आहे.

## संपादित जमिनीची उवरित भरपाई जमीन मालकाला द्या, उच्च न्यायालयाचे राज्य सरकारला आदेश

■ मुंबई : प्रथमेश चव्हाण

मालमत्तेच्या मौल्यवान अधिकारापासून जमीन मालकाला वंचित ठेवता येणार नाही, असे उच्च न्यायालयाने स्पष्ट केले. तसेच, नवी मुंबई शहर वसवण्याच्या प्रकल्पासाठी १९७० मध्ये सिडकोने पनवेल तालुक्यातील अशोक आणि अतुल पुराणिक या दोन भावांच्या भूसंपादन कायद्यांतर्गत संपादित केलेल्या जमिनीची उर्वरित नुकसानभरपाई त्यांना सहा आठवड्यांत देण्याचे आदेश राज्य सरकारला दिले.

मालमत्तेचा अधिकार हा मूलभूत अधिकार नसला तरी घटनात्मक अधिकार आहे. परंतु, एका कुटुंबातील मालमत्तेच्या वादामुळे संपूर्ण भूसंपादन प्रक्रिया अडचणीत आल्याचे हे ज्वलंत उदाहरण असल्याची टीकाही न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि



न्यायमूर्ती सोमशेखर सुंदरेसन यांच्या खंडपीठाने केली. या प्रकरणात जमीन मालकांना जमीन संपादित केल्याची भरपाई मिळाली नाही किंवा त्यांना त्याचे लाभ उपभोगता आले नाहीत. याउलट, या प्रकरणामुळे सिडको आणि अन्य सरकारी प्राधिकरणांचा वेळ आणि पैसा वाया गेल्याची टिप्पणी देखील न्यायालयाने केली.

जमीन संपादनाची कार्यवाही हाताळण्यात आणि योग्य प्रतिज्ञापत्र दाखल करण्यात आलेल्या अपयशावरून न्यायालयाने सरकारच्या भूमिकेवरही ताशेरे ओढले. तसेच, संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांचा या प्रकरणाकडे पाहण्याच्या दृष्टिकोनामुळे जमीन मालकांच्या अधिकारांचे उल्लंघन झाले असले, तरी या अधिकाऱ्यांच्या चुकीच्या वर्तनासाठी सरकारला दंड आकारू शकत नाही.

## आईला रुग्णालयात भेटून घरी जाताना १६ वर्षाच्या मुलाचा मृत्यू

■ मुंबई : विशाल कारंडे

रुग्णालयात उपचार घेणाऱ्या आईला भेटून घरी जाणाऱ्या १६ वर्षाच्या मुलाचा नागपाडा परिसरात झालेल्या अपघातात मृत्यू झाला. मृत मुलगा दुचाकीच्या मागे बसला होता. याप्रकरणी दुचाकीस्वाराविरोधात नागपाडा पोलिसांनी निष्काळजीपणाचा गुन्हा दाखल केला आहे. मृत मुलाच्या डोक्याला गंभीर दुखापत झाल्यामुळे त्याचा मृत्यू झाल्याची माहिती पोलिसांनी दिली. नागपाडा येथून आग्रीपाडा परिसरात जाणाऱ्या वाय पुलावर हा अपघात घडला, अशी माहिती पोलिसांनी दिली. हुथ अन्सारीच्या आईच्या छातीत



दुखू लागल्याने त्यांना शनिवारी आग्रीपाडा परिसरातील एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. उपचार सुरू असताना हुथ रुग्णालयात उपस्थित होता. यावेळी त्याचे कुटुंबियल आणि इतर नातेवाईकही तेथे आले होते. रात्री दीड वाजता त्यांनी अब्दुलला हुथला घरी जाऊन जेवण करून येण्यास सांगितले. आतेभाऊ अब्दुल बरोबर हुथ त्याच्या मोटरसायकलवरून घरी जाण्यासाठी निघाला. मोटरसायकल वाय ब्रिजवरून जात असताना अब्दुलने हलर्जीपणाने भरधाव वेगात मोटरसायकल चालवून पुढे जाणाऱ्या एका दुचाकीला धडक दिली. या अपघातात त्याच्या मागे बसलेला हुथ अन्सारी गंभीररित्या जखमी झाला. त्याला तात्काळ रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. पण रविवारी पहाटे ४ वाजता उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला.

## '...अन् शिंदे म्हणाले, मी सत्तेबाहेर राहून काम करेन', गोगावलेंनी सांगितल्या शिवसेनेच्या अंतर्गत घडामोडी

■ मुंबई : नितीन देवळेकर

देवेंद्र फडणवीस हेच मुख्यमंत्री होणार असून त्यांच्या नावावर भाजपाच्या पक्षश्रेष्ठींनी शिक्कामोर्तब केलं आहे. काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे उपमुख्यमंत्रीपद स्वीकारण्यास राजी झाले असले तरी गृहमंत्रीपद मिळावं यास या



मागणीवर ते ठाम आहेत. दुसऱ्या बाजूला गृहमंत्रीपद सोडण्यास भाजपा व देवेंद्र फडणवीस तयार नसल्याचं सांगितलं जात आहे. त्यामुळे आता गृहखात्यावरून महायुतीत तिढा वाढला आहे. दरम्यान, यावर एकनाथ शिंदे यांचे निकटवर्तीय व त्यांच्या शिवसेना पक्षाचे आमदार भरत गोगावले यांनी यावर प्रतिक्रिया दिली आहे. गोगावले म्हणाले, 'शिवसेनेने कुठलाही हट्ट धरलेला नाही. तसेच महायुतीबाबत प्रसारमाध्यमं सूत्रांच्या हवाल्याने ज्या बातम्या देत आहेत, त्यात तथ्य नाही. शिवसेनेने गृहमंत्रीपदाचा हट्ट धरल्याच्या बातम्या सूत्रांच्या हवाल्याने दिल्या जात आहेत'.


आमदार भरत गोगावले म्हणाले, 'एकनाथ शिंदे यांनी मोठ्या मनाने मुख्यमंत्रीपद नाकारलं आहे. निवडणुकीत महायुतीमध्ये भारतीय जनता पार्टीला सर्वाधिक जागा मिळाल्या आहेत. त्यामुळे आम्ही मुख्यमंत्रीपदासाठी हट्ट धरणं आमच्या स्वभावात बसत नाही. म्हणूनच एकनाथ शिंदे आणि हसत हसत मुख्यमंत्रीपद नाकारलं. तसेच ते म्हणाले, 'भारतीय जनता पार्टीचा मुख्यमंत्री होत असेल तर त्या मुख्यमंत्र्याला माझा पूर्ण पाठिंबा असेल. आम्ही भाजपच्या निर्णयाचं समर्थन करू'. त्यामुळे मुख्यमंत्रीपदावरून होत असलेल्या चर्चेला व प्रश्नांना काहीच अर्थ उरत नाही. आम्ही गृहमंत्रीपद मागितल्याच्या बातम्या सूत्रांच्या हवाल्याने प्रसारमाध्यमं दाखवत आहेत'.

महाडचे आमदार म्हणाले, 'मी परवा एकनाथ शिंदे यांच्याबरोबर होतो. आमच्याबरोबर आमचे इतरही नेते, मंत्री, आमदार होते.

## मनसे नेते अविनाश जाधव यांनी राजीनामा मागे घेतला

■ मुंबई : यश सावंत

ठाणे: यंदाच्या विधानसभा निवडणुकीचे निकाल महाराष्ट्र नवनिर्माण सेनेसाठी अतिशय धक्कादायक होते. स्वबळावर निवडणुकीत उतरलेल्या मनसेला एकाही जागेवर विजय मिळवता आलेला नाही. अविनाश जाधव यांनीही ठाण्यातून निवडणूक लढवली होती. त्यात अविनाश जाधव यांचा पराभव झाला. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे ठाणे आणि पालघर जिल्हाध्यक्ष अविनाश जाधव यांनी पराभवाची नैतिक जबाबदारी स्वीकारून आपल्या पदाचा राजीनामा पक्षाध्यक्ष राज ठाकरे यांच्याकडे दिला. परंतु, राज ठाकरे यांनी तो स्वीकारला नाही. अविनाश जाधव यांनी राज ठाकरेंची भेट घेतली. या भेटीची सविस्तर माहिती अविनाश जाधव यांनी दिली. ठाणे आणि पालघर जिल्हाध्यक्षपदाचा राजीनामा दिला होता. ठाणे आणि पालघर येथे मनसेला एकाही जागेवर विजय मिळवता आला नाही. याची नैतिक जबाबदारी म्हणून राजीनामा दिला होता. मनसे पक्षाचे नेतेपद, नाविक सेनेचे अध्यक्षपद आहे आणि तिसरे ठाणे आणि पालघर



जिल्ह्याचे अध्यक्षपद आहे. यातील फक्त ठाणे आणि पालघर जिल्हाध्यक्षपदाचा राजीनामा दिला होता. पक्षाचा नेता मी होतोच. राजीनामा दिल्यावर राज ठाकरे यांनी बोलावले होते. ठाणे आणि पालघर जिल्ह्याची जबाबदारी तुझीच आहे. तूच या ठिकाणी जिल्हाध्यक्ष म्हणून काम करायचे आहे, असे आदेश राज ठाकरे यांनी दिले.

## 'जयंत पाटलांनी बालमित्र मंडळाचा करेक्ट कार्यक्रम केला', रोहित पाटलांच्या मुख्य प्रतोद निवडीवरून अमोल मिटकरींची खोचक टीका

■ मुंबई : गणेश बागडे

विधानसभेच्या निवडणुकीमध्ये महायुतीला बहुमत मिळालं. मात्र, महाविकास आघाडीला पराभवाचा धक्का बसला. बहुमत मिळाल्यानंतर राज्यात महायुतीचं सरकार स्थापन होईल. यासाठी महायुतीच्या नेत्यांमध्ये हालचाली सुरु आहेत. २३ नोव्हेंबर रोजी निवडणुकीचा निकाल लागून आज आठ दिवस झाले. पण अद्यापही सरकार स्थापन झालेलं नाही. त्यामुळे महायुतीत नेमकं चाललंय काय? असा सवाल राजकीय वर्तुळातून उपस्थित करण्यात येत आहे. यातच महायुतीच्या महाराष्ट्रातील नेत्यांच्या दिल्लीत अमित शाह यांच्याबरोबर देखील काही बैठका पार पडल्या. पण त्यानंतरही मंत्रिपदाचा तिढा सुटला नसल्याचं बोललं जात आहे. तसेच



मुख्यमंत्री पदाची माळ नेमकी कोणाच्या गळ्यात पडणार? हे देखील स्पष्ट झालेलं नाही. यातच दुसरीकडे महाविकास आघाडीचा पराभव झाल्यानंतर आता आघाडीतील नेते कामाला लागले आहेत. तसेच पराभवाची कारणं आघाडीतील नेत्यांकडून शोधण्यात येत आहेत. या पार्श्वभूमीवर आज राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार)पक्षाच्या आमदारांची बैठक पार पडली. या बैठकीत विधानसभेच्या निवडणुकीत पक्षाला मिळालेल्या अपयशाबाबत चर्चा झाली. तसेच यावेळी आमदार जितेंद्र आव्हाड, आमदार रोहित पाटील आणि आमदार उत्तम जानकर यांच्यावर मोठी जबाबादारी सोपवण्यात आली. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाच्या गटनेते म्हणून जितेंद्र आव्हाड यांची निवड करण्यात आली. तसेच राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे मुख्य प्रतोद म्हणून रोहित आर आर पाटील यांची निवड करण्यात आली. तसेच प्रतोद म्हणून उत्तम जानकर यांची निवड करण्यात आली आहे. मात्र, या निवडीवरून आता राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे प्रवक्ते अमोल मिटकरी यांनी खोचक टीका केली आहे. 'जयंत पाटलांनी बालमित्र मंडळाचा करेक्ट कार्यक्रम केला', असं म्हणत अमोल मिटकरींनी रोहित पाटील यांच्या मुख्य प्रतोद निवडीवरून टीका केली आहे. 'तुतारी गटाच्या मुख्य प्रतोद पदी नवखे तरुण आमदार रोहित आर आर आबांवर जबाबदारी देऊन जयंत पाटील साहेबांनी बालमित्र मंडळाचा करेक्ट कार्यक्रम केलाय.

## शपथविधीची घोषणा करायला बावनकुळे राज्यपाल आहेत का? संजय राऊतांचा टोला

■ मुंबई : गणेश बागडे

संपूर्ण महाराष्ट्राला सध्या दोन प्रश्न पडले आहेत. महायुती राज्यात सत्तास्थापन कधी करणार? महाराष्ट्राचा पुढचा मुख्यमंत्री कोण होणार? त्यापैकी एका प्रश्नाचं उत्तर भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिलं आहे. राज्यात सत्तास्थापनेचा मार्ग मोकळा झाला असून येत्या ५ डिसेंबर रोजी शपथविधी सोहळा पार पडणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडेलं असं बावनकुळे यांनी जाहीर केलं आहे. दरम्यान, बावनकुळे यांनी ही घोषणा केल्यानंतर शिवसेनेचे (ठाकरे) खासदार संजय राऊत म्हणाले, 'ही घोषणा करायला बावनकुळे हे काय राज्याचे राज्यपाल आहेत का? त्यांना हे अधिकार कोणी दिले. राज्यापाल महोदयांनी बावनकुळे यांना घोषणा करायला सांगितली होती का?' संजय राऊत म्हणाले, 'पाच तारखेला शपथविधी होईल हे सांगायला ते काय राज्यपाल



आहेत का? मुळात त्यांना हे अधिकार आहेत का आणि हे अधिकार त्यांना कोणी दिले? राज्यपालांनी त्यांना सांगितलं आहे का? राज्यपालांनी बावनकुळेंना कळवलं आहे का?

## शरद पवारांच्या राष्ट्रवादीचा महत्वाचा निर्णय; जितेंद्र आव्हाड, रोहित पाटील आणि उत्तम जानकरांवर सोपवली 'ही' मोठी जबाबदारी

■ मुंबई : राकेश गायकवाड

विधानसभेच्या निवडणुकीत महायुतीला बहुमत मिळालं, तर महाविकास आघाडीला पराभवाचा धक्का बसला. बहुमत मिळाल्यानंतर महायुतीच्या नेत्यांनी राज्यात सरकार स्थापनेसाठी हालचाली सुरु केल्या आहेत. मात्र, आज आठ दिवस होऊनही राज्यात सरकार स्थापन झालेलं नाही. यासाठी महायुतीच्या नेत्यांमध्ये




बैठकांवर बैठका सुरु आहेत. पण अद्याप सरकारमधील मंत्रिपदाचा तोडगा निघालेला नाही. यातच मुख्यमंत्री पदाची माळ कोणाच्या गळ्यात पडणार? हे देखील स्पष्ट झालेलं नाही. यातच दुसरीकडे महाविकास आघाडीचा पराभव झाल्यानंतर आता आघाडीतील नेते कामाला लागले आहेत. तसेच पराभवाची कारणं आता नेत्यांकडून शोधण्यात येत आहेत. या पार्श्वभूमीवरच आज राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाच्या आमदारांची बैठक पार पडली. या बैठकीत विधानसभेच्या निवडणुकीत पक्षाला मिळालेल्या अपयशाबाबत चर्चा झाली. तसेच यावेळी आमदार जितेंद्र आव्हाड, आमदार रोहित पाटील आणि आमदार उत्तम जानकर यांच्यावर मोठी जबाबादारी सोपण्यात आली आहे. यासंदर्भातील माहिती राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली. 'आज पक्ष कार्यालयात बैठक पार पडली. या बैठकीत राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाच्या गटनेते म्हणून जितेंद्र आव्हाड यांची निवड करण्यात आली आहे.

## शिंदेंच्या शिवसेनेतील वाद चव्हाट्यावर; 'आमच्या पक्षातील नेत्यांनी माझं काम केलं नाही', 'या' आमदाराचा केंद्रीय मंत्र्यांवर आरोप

■ मुंबई : वृत्तसंस्था

विधानसभेच्या निवडणुकीमध्ये महायुतीला मोठं बहुमत मिळालं. तर महाविकास आघाडीचा पराभव झाला. विधानसभेत मिळालेल्या यशानंतर महायुतीच्या नेत्यांनी राज्यात सरकार स्थापनेसाठी हालचाली सुरु केल्या आहेत. यासाठी महायुतीच्या नेत्यांमध्ये बैठकांवर बैठका सुरु आहेत. मात्र, तरीही अद्याप सरकार स्थापन होऊ शकलेलं नाही. यातच शिंदेंची शिवसेनेने गृहखातं मागितल्याची चर्चा आहे. दरम्यान, या सर्व घडामोडी सुरु असतानाच शिंदेंच्या शिवसेनेतील अंतर्गत वाद चव्हाट्यावर आला आहे. आमदार संजय गायकवाड यांनी त्यांच्याच पक्षाचे नेते, केंद्रीय मंत्री प्रतापराव



जाधव आणि आमदार संजय कुटे यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. मंत्री प्रतापराव जाधव यांनी आपल्याला निवडणुकीत मदत केली नसल्याचा आरोप करत आमच्या पक्षातील नेत्यांनी माझं काम केलं नाही, असं म्हटलं आहे. तसेच महायुतीमधील भाजपा आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादीनेही विरोधात काम केल्याचा आरोप त्यांनी केला आहे. त्यामुळे ऐन सरकार स्थापन करण्याच्या हालचाली सुरु असतानाच शिंदेंच्या शिवसेनेतील अंतर्गत वाद चव्हाट्यावर आला आहे. 'लोकांनी पैसा, दारू आणि मटण याला जास्त प्राधान्य दिलं. महाराष्ट्रात एवढी विकासकामे नाहीत तेवढी विकास कामे बुलढाण्यात झाली आहेत.

महाराष्ट्र शासन
कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई विद्युत विभाग, सा. बां. विभाग,
राज्य कामगार विमा योजना रूग्णालय आवार, लाल बहादुर शास्त्री मार्ग, मुलुंड (प), मुंबई-४०००८०
ई-मेल पत्ता :- elnorthmumbai.ee@mahapwd.gov.in दूरध्वनी क्रमांक :-०२२-२५६०१३२७
ई-निविदा सुचना क्र. ४९ /२०२४-२५

कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई विद्युत विभाग, मुलूंड, मुंबई हे महाराष्ट्र शासनाकडील विद्युत ठेकेदार (लिफाफा क्र.१ अनुसार) यांचे कडून खालील कामाकरिता ब-१ टक्के वारी नमुन्यातील निविदा, ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यांत यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई विद्युत विभाग, मुलुंड, मुंबई यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| कामाचे नांव : | निविदा रक्कम रूपये : |
|---|---|
| 1. अंदाजपत्रक क्र.अटल/एनएमईडी/एमईएसडी/२४९३१/२०२४-२५, मुख्य महानगर दंडाधिकारी, कुर्ला न्यायालय, एलबीएस रोड, कुर्ला पश्चिम, मुंबई ७० इमारतीमध्ये स्थापित अग्निशमन यंत्रणेची सर्वंकष देखभाल दुरुस्ती करणे. (तिसरी मागणी) | रूपये १००७८०८/- |
| 2. अंदाजपत्रक क्र अटळ/एनएमईडी/एमईएसडी/२४७१८/२०२४-२५, भांडूप पोलिस स्टेशन येथील ओटीस बनावटीच्या एकूण ३ नग उद्वाहनाच्या त्रैवार्षिक सर्वंकष देखभाल व दुरुस्ती करणेबाबत. (दुसरी मागणी) | रूपये १०२५४२४/- |
| 3. अंदाजपत्रक क्र अटळ / एनएमईडी / बीईएसडी / बीकेसी / २४३४० /२०२४-२५, अधिदान व लेखा इमारत, Gr+७ मजला, बीकेसी, वांद्रे (वेस्ट) मुंबई - 400051 येथे अग्निशमन यंत्रणेची त्रैवार्षिक देखभाल दुरुस्तीचे कामे प्रदान करणे | रूपये १४३७५४०/- |
| 4. अंदाजपत्रक क्र .ओडब्लू/ एनएमईडी / बीईएसडी / बीकेसी /२४३०३/२०२४-२५.कलानगर रेस्ट हाऊस, कलानगर वांद्रे (पूर्व) मुंबई 400051 येथे जुने अकार्यक्षम वातानुकित यंत्रणा बदलणे | रूपये ३०८२५४४/- |

ई-निविदा उपलब्ध कालावधी : दि.०३.१२.२०२४ ते दि.१८.१२.२०२४ रोजी १७.३० वा.पर्यंत.
ई निविदा उघडणे : दि.२०.१२.२०२४ रोजी १४.०० वा.नंतर.

खालील संकेतस्थळावर ई निविदाची सर्व माहिती उपलब्धआहे.
१. वरील अंदाजित रक्कमेत जी.एस..टी. सामाविष्ट नसून ठेकेदाराने निविदेत दर भरताना जी.एस..टी.वगळून दर नमूद करावा.अंदाजित रक्कमेवर नमूद केलेल्या दरानुसार आलेल्या रक्कमेवर जी.एस..टी.१८% वेगळा अदा करण्यात येईल.
२. http://mahatenders.gov.in
(सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईट वरती कळविण्यात येईल.)
३. कामाच्या करारनाम्यात पोस्ट क्वॉलिफीकेशनचा क्रायटेरिया समाविष्ट केलेला आहे.
४. कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई विद्युत विभाग, मुलूंड (प), मुंबई कार्यालयातील सूचना फलक.

डीजीआयपीआर/२०२४-२०२५/४८५१

जा.क्र.काअ/उमुंविवि/निविदा/ ३२७९ /२०२४ दिनांक: २८/११/२०२४

सही
कार्यकारी अभियंता,
उत्तर मुंबई विद्युत विभाग,
सा.बां.विभाग, मुंबई.

# शरद पवार पक्षाला सावरू शकतील का? विधानसभेनंतर राष्ट्रवादीसमोर (शरद पवार) आव्हानांचा डोंगर

■ मुंबई : सम्यक कासारे

जुलै २०२३ मध्ये अजित पवार यांच्यासह ४० आमदारांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांची साथ सोडत महायुती सरकारमध्ये सहभागी होण्याचा निर्णय घेतला. त्यावेळी हाताच्या बोटावर मोजता येतील इतके आमदार, खासदार आणि पदाधिकारी शरद पवारांच्याबरोबर राहिले. इतकेच नव्हे तर निवडणूक आयोगाने पक्षाचे नाव आणि चिन्हही तात्पुरत्या स्वरूपात अजित पवार यांच्या पारड्यात टाकले.

इतके सर्व घडल्यानंतरही मे-जूनमध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत शरद पवार यांच्या पक्षाने लढवलेल्या १० जागांपैकी ८ जागा जिंकत मोठे यश मिळवले. मात्र, शरद पवार यांचे हे यश सहा महिनेही टिकू शकले नाही. कारण नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत शरद पवार यांच्या पक्षाला लढलेल्या ८७ पैकी अवघ्या १० जागांवरच विजय संपादीत करता आला. भारतीय राजकारणातील ग्रँडमास्टर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पवार यांना आता पुतणे अजित पवार यांनी चितपट केले आहे. ते आधी त्यांचे बहुसंख्य आमदार आणि खासदार घेऊन गेले, नंतर पक्षाचे नाव आणि चिन्ह (यावर कायदेशीर लढा सुरू असला तरी) आणि आता त्यांनी मतदारांचे समर्थनही मिळवले आहे. दरम्यान महायुतीला विधानसभा निवडणुकीत मिळालेले बहुमत पाहता राष्ट्रवादी काँग्रेसला (शरद पवार) स्वत:ला सिद्ध करण्यासाठी पुढील पाच वर्षांच्या काळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ही एकमेव संधी मिळणार आहे. २०१४ ते २०१८ दरम्यान झालेल्या २७ महापालिकांच्या निवडणुकीत अविभाजित राष्ट्रवादीला ६.९५ टक्के मते मिळाली होती. परंतु निमशहरी आणि ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये त्यांची मते अनुक्रमे १५ टक्के आणि २१ टक्के इतकी होती.

विधानसभा निवडणुकीच्या निकालाच्या दुसऱ्यास दिवशी शरद पवार आपेल राजकीय गुरू यशवंतराव चव्हाण यांच्या दर्शनासाठी कराडमध्ये त्यांच्या स्मृतीस्थळावर गेले होते. त्यावेळी निकालानंतर पहिल्यांदाच बोलताना शरद



पवार म्हणाले होते की, 'मी शांत बसणारा नाही. लोकांना भेटत आणि त्यांचे प्रश्न सोडवत राहीन. माझ्या विचारधारेवर विश्वास ठेवणाऱ्या नव्या पिढीला तयार करणे ही माझी रणनीती असणार आहे.'

शरद पवार यांचो निकटवर्तीय आणि राष्ट्रवादी काँग्रेसचो (शरद पवार) सरचिटणीस जयदेव गायकवाड यांनी कबूल केले की, पक्षाला नजीकच्या भविष्यासाठी तसेच पुढे जाण्यासाठी रोडमॅपची आवश्यकता आहे. 'शरद पवार यांच्या व पक्षाच्या भविष्याबाबत कोणी काहीही बोलले तरी, ते त्यांच्याविचारधारेसाठी लढतच राहतील', असे गायकवाड पुढे म्हणाले. नुकत्याच झालेल्या निवडणुकीत पराभूत झालेल्या पक्षाच्या नेत्यांव्यतिरिक्त राष्ट्रवादीचे संस्थापक शरद पवार १० आमदार आणि आठ खासदारांना एकत्र आणण्यावर लक्ष केंद्रित करणार आहेत. जोपर्यंत त्यांच्याकडे ही संख्यात्मक ताकद आहे, तोपर्यंत राज्य आणि राष्ट्रीय राजकारणातील त्यांचे महत्त्व संपले असे म्हणता येणार नाही, असे एका सूत्राने सांगितले. योगायोगाने, विधानसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान शरद पवारांनी वयाचे कारण देत संसदीय राजकारणातून निवृत्ती घेण्याचे संकेत दिले होते. पण, गंमत अशी आहे की, २०२६ मध्ये निवृत्त झाल्यावर पवारांना राज्यसभेवर परत पाठवण्यासाठी आमदारांच्या मतांचा कोटाही आता राष्ट्रवादीकडे (शरद पवार) असणार नाही. केवळ एका निवडणुकीने महाविकास आघाडीचा अंत होईल, असे भाकीत करणे चुकीचे ठरेल, असा प्रतिवाद प्रदेश काँग्रेसचे प्रवक्ते अनंत गाडगीळ यांनी केला आहे.

# 'आजारी व्यक्तीच्या मरणाची कामना...', वडिलांच्या आरोग्यावर विरोधकांकडून विधान, पूर्वा वळसे पाटील संतापल्या

■ मुंबई : प्रथमेश चव्हाण

राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे नेते, माजी मंत्री दिलीप वळसे पाटील यांचा आंबेगाव विधानसभा मतदारसंघातून निसटता विजय झाला. अवघ्या दीड हजार मतांनी त्यांनी शरद पवार गटाचे उमेदवार देवदत्त निकम यांचा पराभव केला. शरद पवार यांनी दिलीप वळसे पाटील यांना पाडण्याचे आवाहन आंबेगावच्या सभेत केले होते. त्यामुळे आंबेगावच्या निकालाकडे राज्याचे लक्ष लागले होते. मात्र आता आंबेगावमध्ये वेगळीच चर्चा सुरू आहे. विरोधकांनी घेतलेल्या आभार मेळाव्यात बोलताना 'लवकरच विधानसभेच्या मध्यावधी निवडणुकांना आपल्याला सामोरे जावे लागेल', असे विधान केले होते. यावर आता दिलीप वळसे पाटील यांची मुलगी पूर्वा वळसे पाटील यांनी प्रत्युत्तर दिले आहे. आपल्या वडिलांच्या मृत्यूची कामना केली गेली, असा आरोप पूर्वा वळसे पाटील यांनी केला.



पूर्वा वळसे पाटील यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत आपला संताप व्यक्त केला आहे. त्या म्हणाल्या, 'काही महिन्यांपूर्वी त्यांचा एक दुर्दैवी अपघात झाला. एका मोठ्या शस्त्रक्रियेनंतर ते या दुखापतीतून जिद्दीने बाहेर पडण्याचा प्रयत्न करत आहेत. आम्ही संपूर्ण कुटुंब या धक्क्यातून सावरण्याचा प्रयत्न करत आहोत. त्यांच्यावर झालेल्या मोठ्या शस्त्रक्रियेमुळे त्यांची प्रकृती थोडीशी खालावलेली असते. थोड्याच दिवसात ते या संकटावर सुद्धा मात करून नक्कीच पूर्वीसारखे व्हावेत अशी आम्ही रोज परमेश्वराकडे प्रार्थना करतो. परंतु काही दिवसांपूर्वी विरोधकांच्या आभार मेळाव्यात त्यांच्या प्रकृती बद्दल बोलताना 'लवकरच विधानसभेच्या मध्यावधी निवडणुकांना आपल्याला सामोरे जावे लागेल' असे अभद्र वक्तव्य केले गेले.' 'हे ऐकल्यानंतर काय बोलावे मला सुचत नाही. काही दिवसांपूर्वी वळसे पाटील साहेबांचा फोटो ज्यांनी आपल्या घरातील देव्हाऱ्यात लावला होता तेच आज साहेबांच्या अंताची प्रार्थना करीत आहेत? तुम्ही नक्की निवडणुका लढा, जिंका, त्यात हरकत असण्याचे काही कारण नाही परंतु या सर्व गोष्टी करत असताना उन्माद किती असावा? सत्ता मिळवण्याच्या नादात आपण किती खालच्या पातळीला जात आहोत? शत्रुत्व करण्याच्या नादात आपण कोणतीच मर्यादा ठेवली नाही का? सुसंस्कृतपणाचा वारसा सांगणाऱ्या आपल्या तालुक्यातील राजकारणाचा स्तर इतका खाली गेलाय का? तालुक्यात पस्तीस वर्षे जनतेची अविरत सेवा केलेल्या एका ज्येष्ठ व्यक्तीच्या प्रकृतीबद्दल असे बोलताना आपली जीभ जराही कचरली नाही का?', अशा शब्दात पूर्वा वळसे पाटील यांनी आपला संताप व्यक्त केला.

# चामड्याऐवजी आता सिंथेटिक तबला! मिरजेत निर्मिती, वातावरण बदलाने बिघडणारा ताल दुरुस्त

■ सांगली : नितीन देवळेकर

गायकाचे गाणे ऐन रंगात आले असतानाच तबल्यातून ताल सुटला, तर गायकाचे गाणे बेताल होते. हा बेतालपणा कायमचा दूर करण्यासाठी वाद्यनगरी असलेल्या मिरजेतील विजय व्हटकर या चर्मवाद्य कारागिराने वातावरणाचा कोणताही परिणाम टाळणाऱ्या आणि चामड्याचा वापर टाळत सिंथेटिक तबल्याची निर्मिती केली आहे. चर्मवाद्यातील या क्रांतिकारी यशाने तबल्यावरील कलाकारांचे ताक-धिना-धिनचे ताल हे आता अखंडित राहत संगीत सजवतील. व्हटकर यांनी या तबल्याचे स्वामित्व हक्कही मिळवले आहे.

संगीत सभेत गायक आपली कला सादर करत असताना तल्लीन झालेला असतो. अशा वेळी गायकाला साथ देणाऱ्या एखाद्या वाद्याचा स्वर बदलला, तर गायकाचा आणि रसिकांचाही रसभंग होतो. व्यासपीठावरील प्रकाश योजना आणि तबलजीची पडणारी बोटे यामुळे



तबल्यावरील चामड्यामध्ये बदल होतो. या बदलामुळे तबल्याचा ध्वनी बऱ्याच वेळा कमी-जास्त होतो. तबला पुन्हा लावण्यासाठी तबल्याभोवती असलेल्या खुंट्या हातोड्याने कमी-जास्त करून चामड्याला कमी-अधिक ताण देऊन गमावलेला ध्वनी मिळवावा लागतो. त्यामुळे बऱ्याचदा गायकाची तल्लीनता खंडित होते. हे सारे टाळता येईल का, या हेतूने व्हटकर यांनी या सिंथेटिक तबल्याची निर्मिती केली आहे.

वादक, गायक यांच्या सूचनेला प्रतिसाद देत मिरजेतील चर्मवाद्यनिर्मिती करणाऱ्या श्री. व्हटकर यांनी तबल्यासाठी सिंथेटिकचा वापर करण्याचा प्रयत्न गेल्या अडीच वर्षांपासून सुरू केला. सुरुवातीस त्यावर शाई टिकत नसल्याचे त्यांना दिसून आले. यामुळे पुन्हा नवीन प्रयोग करत त्यांनी विविध प्रकारच्या रसायनांचा वापर करून शाई तयार केली. यात यश येत शाई निघण्याच्या धोक्यावरही त्यांनी मात केली. पारंपरिक चामड्याच्या तबल्यातून निघणारा ध्वनी किमान पाच ते नऊ आस (सेकंद) असतो. या नव्या तबल्यामध्ये हाच ध्वनी १७ आस मिळत आहे. एकदा तबला लावला, की तो पुन्हा लावावा लागत नाही. लावलेला ध्वनी कायम राहतो. त्यामुळे गायकाच्या गायनात व्यत्यय येत नाही. व्हटकर यांनी बनवलेल्या या नव्या पद्धतीच्या तबल्याला ख्यातकीर्त तबलजींकडूनही दाद मिळत आहे. या तबल्याचे स्वामित्व हक्कही व्हटकर यांनी मिळवले आहेत.

# भाज्यांचे दर कडाडले; थंडीच्या लाटेमुळे भाजी काढणीसाठी विलंब झाल्याने आवक घटली

■ ठाणे : तृप्ती गोरे

यंदा परतीचा पाऊस लांबल्यामुळे भाज्यांच्या पिकांचे मोठे नुकसान होऊन त्यांचे उत्पादन घटले होते. पाऊस थांबल्यानंतर पुन्हा भाज्यांच्या पिकाची लागवड करण्यात आली. परंतु सध्या राज्यात सर्वत्र थंडीची लाट पसरली आहे. हे वातावरण भाज्यांच्या वाढीस पूरक नसल्यामुळे भाजी काढणीसाठी तयार होण्यास विलंब होत आहे. त्यामुळे बाजारात काही भाज्यांची आवक घटली असून त्यांच्या दरात वाढ झाल्याचे चित्र आहे.



नवी मुंबई येथील वाशी कृषी उत्पन्न बाजार समितीत पुणे, जुन्नर, नगर, सातारा, बारामती अशा विविध जिल्ह्यांतून भाज्या दाखल होतात. या बाजार समितीतून या भाज्या ठाणे, मुंबई तसेच उपनगरातील किरकोळ बाजारात विक्रीसाठी जातात. नियमित बाजार समितीत अंदाजे ५५० ते ६०० भाज्यांच्या गाड्या दाखल होत असतात. गेले काही दिवसांपासून बाजार समितीत दुधी भोपळा, गवार, कोबी, दोडका, वांगी, शेवगा या भाज्यांची आवक घटल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे त्यांच्या दरात १० ते २० टक्के वाढ झाली आहे. परिणामी, किरकोळ बाजारातही या भाज्यांच्या दरात मोठी वाढ झाली आहे. सध्या राज्यात सर्वत्र थंडीची लाट पसरली आहे. हे वातावरण काही भाज्यांच्या वाढीसाठी पूरक नसल्यामुळे या भाज्यांची वाढ होण्यास विलंब होत आहे. त्यामुळे भाज्यांचे उत्पादन घटल्याची माहिती नवी मुंबईचे घाऊक भाजीपाला व्यापारी महासंघाचे अध्यक्ष बाळासाहेब बडदे यांनी दिली. चौकट भारतात लसणाचे पीक झाले नसून इजिप्त आणि अफगाणिस्तान या देशांतून लसणाची आयात केली जात आहे. मागील वर्षीच्या तुलनेत यंदा लसणाची साठवण कमी आहे. मागील वर्षी १० ते २० प्रतिकिलो रुपयांनी बाजार भावाने लसूण विक्री केला जात होता.

# 'फेंगल'मुळे पुद्दुचेरीत जनजीवन विस्कळीत: चक्रीवादळाचा वेग मंदावला

■ पुद्दुचेरी : वृत्तसंस्था

'फेंगल' चक्रीवादळामुळे रविवारी झालेल्या मुसळधार पावसामुळे पुद्दुचेरीमध्ये जनजीवन विस्कळीत झाले. चक्रीवादळ पुद्दुचेरीजवळ स्थिर झाले असून त्याची गती हळूहळू कमी होईल, अशी माहिती विभागाने दिली. रविवारी सर्व दुकाने व व्यावसायिक प्रतिष्ठाने बंद होती. सरकारने सखल भागातून सुरक्षित बाहेर काढलेल्या नागरिकांसाठी मदत केंद्र स्थापन केले आहे. दरम्यान, शनिवारी मध्यरात्रीनंतर विमानतळावरून संचालन सुरू करण्यात आले असले तरी रविवारी अनेक उड्डाणे रद्द करण्यात आली किंवा उशिराने झाली. भारतीय हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, पुद्दुचेरीमध्ये रविवारी सकाळी ९ वाजेपर्यंत गेल्या २४ तासांत ४६ सेमी पावसाची नोंद झाली. चक्रीवादळामुळे झालेल्या मुसळधार पावसामुळे बुलीवर्ड हद्दीतील सर्व निवासी भाग पाण्याखाली गेले. चक्रीवादळाच्या



तडाख्याने अनेक ठिकाणी झाडे उन्मळून पडली. शनिवारी रात्री अकरा वाजल्यापासून बहुतांश भागात वीजपुरवठा खंडित झाल्याचे वृत्त आहे. दरम्यान, निवासी वसाहतींमध्ये पूर आला असून वाहने पावसाच्या पाण्यात अंशतः बुडाली. अनेक घरांमध्ये पाणी शिरल्याचे लोकांनी सांगितले. निसर्गाचा असा कहर तीन दशकांपूर्वी केंद्रशासित प्रदेशातही पाहायला मिळाला होता, असे वृद्धांचे म्हणणे आहे. पावसामुळे मुख्य रस्ते पाण्याखाली गेल्याने दैनंदिन जनजीवन विस्कळीत झाले. अतिवृष्टीचा फटका शेतातील पिकांना बसला आहे. वाहतूक सेवा प्रभावित झाल्या होत्या. अनेक बाधित भागांत बचावकार्य सुरू असून पूरग्रस्त भागातून शेकडो लोकांना बाहेर काढण्यात आल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. अधिकाऱ्यांनी सांगितले की, जीवा नगर आणि इतर संवेदनशील भागात लोकांना बाहेर काढण्यासाठी आणि आवश्यक मदत पुरवण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

# इस्कॉन च्या ५० हुन अधिक सदस्यांना बांगलादेशने भारतात येण्यापासून रोखलं

■ मुंबई : वृत्तसंस्था

बांगलादेशात सध्या इस्कॉनवरून मोठा गोंधळ सुरू आहे. अशात, भारतात येणाऱ्या इस्कॉनच्या ५० हून अधिक सदस्यांना बांगलादेश प्रशासनाने रोखल्याचे वृत्त इस्कॉन कोलकातासह अनेक बांगलादेशी माध्यमांनी दिले आहे. सर्व वैध कागदपत्रे असूनही इस्कॉनच्या सदस्यांना भारतात प्रवेश करण्यापासून रोखल्याचो या माध्यमांनी म्हटले आहे. त्यांनी आपल्या वृत्तांमध्ये असा दावा केला की, इस्कॉनच्या ६३ सदस्यांना बांगलादेशी अधिकाऱ्यांनी आंतरराष्ट्रीय सीमेपाशी बेनापोल बंदरावर संशयास्पद हालचालींमुळे रोखले. 'बांगलादेशातून आलेल्या बातम्यांनुसार, तेथिल विविध जिल्ह्यांतील इस्कॉनचे ६३ शनिवारी संध्याकाळी आणि रविवारी सकाळी बेनापोल बंदरावर भारतात प्रवेश करण्यासाठी आले होते, परंतु संशयास्पद हालचालींमुळे त्यांना इमिग्रेशन पोलिसांनी रोखले,' असे टाईम्स ऑफ इंडियाने आपल्या वृत्तात म्हटले आहे.बांगलादेशी प्रसार माध्यमांना दिलेल्या वृत्तानुसार, इमिग्रेशन चेक-पोस्टचे अधिकारी इम्तियाज मोहम्मद अहसानुल म्हणाले की, 'आम्ही ५४ बांगलादेशी प्रवाशांना त्यांच्या भारतात जाण्याच्या संशयास्पद हेतूंमुळे प्रवासाची परवानगी नाकारली आहे.' यावेळी इम्तियाज मोहम्मद अहसानुल प्रवास करण्यापासून रोखलेल्या इस्कॉनच्या इतर ९ सदस्यांचा




उल्लेख केला नाही.

इस्कॉन कोलकाताचो उपाध्यक्ष राधारमण दास यांनी दिलेल्या माहितीनुसार, 'भारताच्या सीमेवर बांगलादेशी पोलिसांनी रोखलेले लोक, बांगलादेशच्या विविध भागातील इस्कॉनचो सदस्य होते. बांगलादेशातील परिस्थितीमुळे त्यांनी भारतातील तीर्थयात्रेसाठी येण्याचा निर्णय घेतला होता. परंतु बांगलादेशी पोलिसांनी शनिवारी ९ आणि रविवारी आणखी ५४ सदस्यांना सीमेवरच रोखले. वैध व्हिसा आणि इतर वैध कागदपत्रे असूनही त्यांना दुसऱ्या देशात जाण्याची परवानगी कशाच्या आधारावर नाकारली जात आहे?'

# संभलमधील मशिदीचे व्यवस्थापन सोपवा; पुरातत्त्व खात्याचा न्यायालयात युक्तिवाद

■ संभल : विशेष प्रतिनिधी

'संभलमधील मुघल काळातील शाही जामा मशीद ही संरक्षित वारसास्थळांपैकी एक असून, तिचे नियंत्रण व व्यवस्थापन आपल्याकडे द्यावे,' असे पुरातत्त्व खात्याने न्यायालयाला दिलेल्या प्रतिसादात म्हटले आहे. न्यायालयाने पुरातत्त्व खात्याला मशिदीचा सव्हे करण्याची अनुमती दिली होती. त्यानंतर या ठिकाणी हिंसाचार झाला होता. चार जणांचा मृत्यू त्यात झाला.

पुरातत्त्व खात्याचे न्यायालयात प्रतिनिधित्व करणारे विष्णू शर्मा यांनी सांगितले की, पुरातत्त्व खात्याने न्यायालयात आपला प्रतिवाद सादर केला आहे. मशिदीची व्यवस्थापन समिती आणि स्थानिकांकडून या स्थळाचा सव्हे करण्यात अडथळे निर्माण झाले. १९ जानेवारी २०१८ रोजी मशिदीमधील पायऱ्यांवर कुठल्याही परवानगीशिवाय स्टील रेलिंग बसविण्याबद्दल व्यवस्थापन समितीवर गुन्हा दाखल झाला असल्याचेही पुरातत्त्व खात्याने म्हटले आहे. ही मशीद १९२० मध्ये पुरातत्त्व खात्याकडून संरक्षित असल्याचे नमूद आहे. त्यानुसार या ठिकाणी



सर्व जनतेला परवानगी देण्याची गरज आहे. या ठिकाणाचे नियंत्रण आणि व्यवस्थापन, बांधकामातील कुठल्याही प्रकारच्या सुधारणा पुरातत्त्व खात्याकडेच असायला हव्यात. मशिदीच्या व्यवस्थापन समितीकडून बांधकामामध्ये विनापरवाना करण्यात आलेले बदल बेकायदा असून, त्यावर मर्यादा घालायला हव्यात. या प्रकरणावर येत्या काही दिवसांत न्यायालय सुनावणी घेण्याची शक्यता आहे. न्यायायलाने मशिदीचा सव्हे करण्याच्या सूचना दिल्यानंतर झालेल्या हिंसाचारात चार जणांचा मृत्यू आणि इतर अनेक जण जखमी झाले होते. या हिंसेची चौकशी करण्यासाठी तीन जणांची न्यायिक आयोगाची स्थापना करण्यात आली. संभलमध्ये झालेल्या हिंसाचाराची चौकशी करण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या न्यायिक आयोगाच्या सदस्यांनी अत्यंत कडक सुरक्षा व्यवस्थेत येथील मशीद आणि हिंसाग्रस्त भागाला भेट दिली.

# नाही, नाही म्हणत जो बायडेन यांनी 'तो' निर्णय घेतलाच; शस्त्र आणि कर फसवणूक प्रकरणात शेवटच्या क्षणी...

■ न्यूयॉर्क : वृत्तसंस्था

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बायडेन यांनी त्यांचा मुलगा हंटर बायडन यांना बेकायदेशीरपणे शस्त्र बाळगल्याबद्दल आणि कर चुकवेगीरी प्रकरणात माफी दिली आहे. विशेष म्हणजे बायडेन आपल्या मुलाची शिक्षा कमी करणार नाहीत किंवा त्याला माफ करणार नाहीत, असे व्हाईट हाऊसकडून सातत्याने सांगितले जात होते.

व्हाईट हाऊसने जारी केलेल्या निवेदनानुसार, बायडेन म्हणाले, 'आज मी माझा मुलगा हंटर याच्या क्षमा याचिकेवर स्वाक्षरी केली. मी पदभार स्वीकारल्याच्या दिवसापासून न्याय विभागाच्या निर्णय प्रक्रियेत हस्तक्षेप करणार नाही असे सांगितले होते आणि मी माझे वचन पाळले आहे.' जूनमध्ये, हंटर बायडेन यांना डेलावेअर गन प्रकरणात खटल्याला सामोरे जावे लागले होते. त्यावेळी जो बायडेन यांनी, ज्युरींच्या निर्णयाचे पालन करत हंटर यांना माफ करणार नाहीत, असे म्हटले होते. दरम्यान यंदाच्या अध्यक्षीय निवडणुकीत विजय मिळवत माजी अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दमदार पुनरागम केले आहे. ट्रम्प यांच्या विजयनानंतर काही दिवसांनी, व्हाईट हाऊसच्या प्रेस सेक्रेटरी करीन जीन-पिअरे यांनी हंटर बायडेन यांना क्षमा मिळणार नाही, असे म्हटले होते. मात्र, रविवारी संध्याकाळी जो बायडेन यांनी हंटर बायडेन यांच्या क्षमा याचिकेवर स्वाक्षरी केली. यावेळी जो बायडेन



यांनी आपल्या मुलाविरोधातील खटला राजकीय हेतून प्रेरित असल्याचा आरोपही केला.

यावेळी हंटर बायडेन यांना माफी देण्याच्या निर्णयाचा बचाव करताना जो बायडेन म्हणाले, 'हंटरवरील आरोप राजकीयदृष्ट्या प्रेरित आहेत. मला राजकीयदृष्ट्या फटका बसावा या उद्देशाने ते करण्यात आले होते. काँग्रेसमधील माझ्या अनेक राजकीय विरोधकांनी माझ्या निवडणुकीला विरोध करण्यासाठी हे आरोप केले आहेत. हंटरच्या प्रकरणांची वस्तुस्थिती पाहणारी कोणतीही व्यक्ती हंटर केवळ माझा मुलगा आहे म्हणून त्याच्यावर आरोप झाले, याशिवाय इतर कोणत्याही निष्कर्षापर्यंत पोहोचू शकत नाही.' अमेरिकेचे अध्यक्ष जो बायडेन यांचा मुलगा हंटर बिडेन यांच्यावर करचुकवेगिरीपासून बेकायदेशीरपणे शस्त्रे बाळगणे, सरकारी पैशांचा गैरवापर आणि खोटी साक्ष देणे यासारखे आरोप आहेत. दरम्यान हंटर बायडेन यांनी डेलावेअर न्यायालयात कर फसवणूक आणि बेकायदेशीरपणे शस्त्र बाळगल्याचा आरोप स्वीकारला होता. हंटर बायडेन परदेशी कंपन्यांसाठी लॉबीस्ट, वकील आणि सल्लागार म्हणून काम करतात. यासह ते गुंतवणूक बँकर आणि कलाकारही आहेत.

महाराष्ट्र क्राईम टाइम्स



# पाकिस्तानला २१० सीक्रेट पाठवणारा एटीएसच्या जाळ्यात

■ **गुजरात : विशेष प्रतिनिधी**

भारतीय तटरक्षक दलाच्या जहाजांची गोपणीय माहिती पाठवणाऱ्या एका आरोपीला गुजरातच्या दहशतवादी विरोधी पथकाने (एटीएस) पकडले आहे. आरोपी जहाजांची संवेदनशील माहिती पाकिस्तानी एजंटला देत होता. आरोपीचे नाव दीपेश गोहील आहे. तो ओखा पोर्टवर कर्मचारी आहे. त्याला ही माहिती देण्याच्या मोबदल्यात रोज फक्त २०० रुपये मिळत होते. या कामासाठी त्याने आतापर्यंत ४२,००० रुपये घेतले आहे. म्हणजेच त्याने २१० सीक्रेट पाकिस्तानला दिल्याचे स्पष्ट झाले आहे. केवळ २०० रुपयांसाठी त्याने देशाशी गद्दारी केली. एटीएसने दिलेल्या माहितीनुसार, दीपेश फेसबुकच्या माध्यमातून पाकिस्तानी एजंटच्या संपर्कात आला. ही एजंट स्वत:ला 'साहिमा' असल्याचे सांगून दीपेशसोबत बोलत होती. त्यांची फेसबुकवर मैत्री झाली. त्यानंतर व्हॉट्सअॅपच्या माध्यमातून त्यांचा संपर्क वाढला. एजंटने दीपेशकडून ओखा पोर्टवर असलेल्या कोस्ट गार्डच्या जहाजांचे नावे आणि नंबर मागितले होते. ती माहिती दीपेशने तिला दिली. त्या एजंटची खरी ओळख अजून समोर आली नाही. एटीएस अधिकारी सिद्धार्थ म्हणाले की, दीपेश अनेक प्रकारची माहिती पाकिस्तानी एजंटला देत असल्याचे आम्हाला समजले. त्यानंतर त्याच्यावर लक्ष ठेवण्यात आले. पाकिस्तानी नौदलाच्या एजंटला त्याने माहिती दिल्याचे समोर आले. त्यानंतर त्याला अटक करण्यात आली. २०० रुपये घेऊन तो माहिती देत असल्याचे चौकशीत समोर आले. त्याच्या बँक खात्याऐवजी तो मित्राच्या खात्यावर ही रक्कम मागवत होता. तो मित्राकडून रोख रक्कम घेत होता. ही रक्कम वेल्डींगच्या कामातून मिळत असल्याचे तो सांगत होता. आतापर्यंत त्याने ४२,००० रुपये घेतल्याचे स्पष्ट झाले. गुजरात एटीएसने सांगितले की, पाकिस्तानी नौदलातील एजंट कोस्ट गार्डची माहिती मिळवण्यासाठी कमी पैशांत माहिती देणारे लोकांना शोधत आहे. गुजरात एटीएस कोस्ट गार्डसोबत समुद्र किनाऱ्यावरुन होणारी अंमलीपदार्थांची तस्करी रोखण्याचे काम करत आहे. अशावेळी कोस्ट गार्डच्या जहाजांची माहिती पाकिस्तानला उपयुक्त ठरणारी आहे. तसेच युद्धाच्या काळात ही माहिती कोणत्याही देशासाठी धोकादायक सिद्ध होऊ शकते. मागील महिन्यातही पंकज केटिया याला अटक केली होती. तो ही कोस्ट गार्डची माहिती पाकिस्तानी एजंटला देत होता.




# मतिमंद, दिव्यांग महिलेवर अत्याचार करणाऱ्यास दहा वर्षे सक्तमजुरी

■ **मुंबई : विशेष प्रतिनिधी**

एका मतिमंद आणि दिव्यांग महिलेच्या असहाय्यतेचा फायदा घेत तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याबद्दल दोषी आरोपीला सोलापूरचे अतिरिक्त सत्र न्यायाधीश सूरज केंद्रे यांनी दहा वर्षे सक्तमजुरी व दंडाची शिक्षा सुनावली आहे. गणेश अभिमन्यू माने (वय ४२, रा. उत्तर सोलापूर) असे शिक्षा झालेल्या आरोपीचे नाव आहे. याबाबत पीडितेच्या नातेवाइकांच्या फिर्यादीनुसार सोलापूर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. यातील पीडिता ही मतिमंद आणि दिव्यांगदेखील आहे. ६ डिसेंबर २०२० रोजी रात्री पीडिता ही तिच्या घरातील खोलीत झोपली असता आरोपी गणेश माने याने तिच्या असहाय्यतेचा फायदा घेत तिच्यावर अत्याचार केल्याचा सरकार पक्षाचा आरोप होता.



# मनसेचा अंतर्गत वाद चव्हाट्यावर! पदाधिका-यावर जीवघेणा हल्ला

■ **पालघर : विशेष प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीतील अपयशानंतर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतील अंतर्गत वाद चव्हाट्यावर आला आहे. विधानसभा निवडणुकीत उभ्या केलेल्या उमेदवारांना अपेक्षित अर्थसहाय्य मिळालं नसल्याची तक्रार केल्याच्या काही तासातच महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पालघर चे लोकसभा अध्यक्ष समीर मोरे आणि त्यांचे भाऊ आतिश मोरे यांच्यावर जीवघेणा हल्ला करण्यात आला आहे. मनसेचे ठाण्यातील नेते आणि पालघर जिल्हाध्यक्ष अविनाश जाधव आणि त्यांच्यासोबत असलेल्या १५ ते २० जणांनी हा हल्ला केल्याचा आरोप करण्यात येत आहे. पालघर जिल्ह्यात विधानसभा निवडणुकीत मनसेतर्फे पालघर व्यतिरिक्त उर्वरित पाच ठिकाणी उमेदवार दाखल केले होते. या उमेदवारांना अपेक्षित अर्थसहाय्य व आवश्यक सहकार्य न मिळाल्याने या सगळ्यांचा दारुण पराभव झाला होता. याबाबत अविनाश जाधव यांना वरिष्ठांकडून विचारणा केल्यानंतर त्यांनी ठाणे व पालघर जिल्हा पक्ष अध्यक्ष पदाचा राजीनामा दिला होता. पालघरच्या स्थानीय नेत्यांनी राज ठाकरे यांच्याकडे आपल्याविरुद्ध थेट तक्रार केल्याचा राग मनात धरून अविनाश जाधव आणि त्यांच्यासोबत असलेल्या १५ ते २० जणांनी संध्याकाळी सात वाजेच्या सुमारास समीर मोरे यांच्या तारापूर औद्योगिक वसाहतीच्या वेशीवर असणाऱ्या पाम गावातील कार्यालयात शिरून समीर मोरे यांना मारहाण केली तर त्यांचे भाऊ आतिश मोरे यांच्यावर धारधार शस्त्राने वार करून पळ काढला. या हल्ल्यात जखमी झालेल्या अतिश मोरे यांना बोईसर मधील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्या हाताला आणि डोक्याला जखम झाली असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती वैद्यकीय अधिकाऱ्याने दिली.समीर मोरे आणि त्यांच्या भावावर जीवघेणा हल्ला झाल्याची बातमी पसरताच महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या कार्यकर्त्यांनी रुग्णालयात गर्दी केली आहे.



विधानसभा निवडणुकीनंतर अवघ्या काही दिवसातच मनसेतील अंतर्गत वाद चव्हाट्यावर आला आहे. पालघर मनसेचे जिल्हाध्यक्ष समीर मोरे आणि त्यांचे भाऊ आतिश मोरे यांच्यावर जीवघेणा हल्ला केला असून हा हल्ला अविनाश जाधव यांनी केलाच आरोप पालघर मधील मनसे पदाधिकाऱ्यांकडून करण्यात आला आहे.

# नाशिकमध्ये चोरीच्या गुन्ह्यांना प्रतिबंध ४६१ उपद्रवींविरोधात कारवाई

■ **नाशिक: विशेष प्रतिनिधी**

शहरात वाढलेल्या सोनसाखळी चोरीच्या गुन्हयांना प्रतिबंध आणि टवाळखोरांवर कारवाईसाठी पोलीस आयुक्तालय हद्द परिसरात अचानक शोध मोहीम राबविण्यात आली. या मेहिमेत ४६१ जणांविरुध्द कारवाई करण्यात आली. पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांच्या आदेशानुसार परिमंडळ एक आणि दोनचे उपायुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच पंचवटी, सरकारवाडा, अंबड, नाशिकरोड




विभाग यांच्या सहायक आयुक्तांच्या देखरेखीखाली सर्व पोलीस ठाण्यांच्या प्रभारी अधिकाऱ्यांनी ही मोहीम राबवली. परिमंडळ एक अंतर्गत सार्वजनिक ठिकाणी उपद्रव करणाऱ्या २३३ जणांविरुद्ध कारवाई करण्यात आली. २३२ संशयित वाहनांची तपासणी करुन ३२ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. परिमंडळ दोन अंतर्गत सार्वजनिक ठिकाणी उपद्रव करणाऱ्या २२८ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. ९६ संशयित वाहनधारकांवर ६८, ५०० रुपयांची दंडात्मक कारवाई करण्यात आली.

# विनयभंग प्रकरणी दाखल फौजदारी कारवाई रद्द, इंडिगो एअरलाइन्सच्या सहाय्यक सुरक्षा व्यवस्थापकाला न्यायालयाचा दिलासा

■ **मुंबई : विशेष प्रतिनिधी**

महिला प्रवाशाच्या हातातील पिशवी हिसकावून तिचा विनयभंग केल्याच्या आरोपप्रकरणी इंडिगो एअरलाइन्सच्या सहाय्यक सुरक्षा व्यवस्थापकाविरुद्ध सुरू केलेली फौजदारी कारवाई उच्च न्यायालयाने नुकतीच रद्द केली. भारतीय दंड संहितेच्या कलम ३५४ चा विचार केल्यास, कोणत्याही महिलेचा विनयभंग करण्याच्या उद्देशाने बळाचा वापर करण्याचा संबंधित व्यक्तीचा हेतू असणे आवश्यक आहे. मात्र, या प्रकरणात याचिकाकर्त्याचा असा कोणताही हेतू होता, हे आढळून येत नाही. त्यामुळे, पुराव्यांवरून याचिकाकर्त्याविरोधात सकृतदर्शनी फौजदारी कारवाई केली जाऊ शकत नाही, असे निरीक्षण न्यायमूर्ती भारती डांगरे आणि न्यायमूर्ती मंजुषा देशपांडे यांच्या खंडपीठाने नोंदवले. तक्रारदार महिला आणि तिचा पती १२ जानेवारी २०१६ रोजी कोचीहून अहमदाबादमार्गे मुंबईला येत होते. दुपारी विमान मुंबईत दाखल झाले.



# पुणे पोलीसांची बेपत्ता मुले-महिलांच्या शोधासाठी ऑपरेशन 'मुस्कान मोहीम' सुरू

■ **पुणे : विशेष प्रतिनिधी**

पुण्यामध्ये गुन्हेगारीचे प्रमाणे दिवसेंदिवस वाढत आहे. तसेच महिला व लहान मुलांना अपहरण करण्याचे प्रमाण देखील वाढले आहे. यामुळे पुणे पोलिसांनी नवीन प्लॅन केला आहे. पुण्यातून बेपत्ता झालेल्या मुलांच्या तसेच महिलांच्या शोधासाठी पुणे पोलीस 'ऑपरेशन मुस्कान – १३' ही विशेष मोहीम राबविली जाणार आहे. १ ते ३० डिसेंबर या कालावधीत ही मोहिम राबविली जाणार असून, मोहिमेच्या अनुषंगाने पुणे पोलिसांच्या अनैतिक मानवी वाहतुक व्यापार प्रतिबंध कक्ष, गुन्हे शाखा तसेच सर्व पोलीस ठाण्यांत पथकाची स्थापना करण्यात येणार आहे. 'ऑपरेशन मुस्कान – १३' ही राज्यभरातील अल्पवयीन मुले आणि १८ वर्षांवरील महिलांचा शोध घेण्यासाठी राबविण्यात येणार आहे. एक प्रभावी उपक्रम म्हणून दरवर्षी पोलीस विभागाकडून ही विशेष मोहिम राबवली जाते. शहरातील सर्व पोलीस अधिकाऱ्यांना याबाबतचे आदेश देण्यात आले आहेत. शहरातून बेपत्ता झालेली लहान मुले, महिलांचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून युद्धपातळीवर प्रयत्न करण्यात येतात. मात्र, दरवर्षी एक महिना यासाठी विशेष प्रयत्न केले जातात. त्यानुसार यंदाही ही मोहिम राबविली जाणार आहे, अशी माहिती पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिली आहे. पथकाच्या माध्यमातून शहरातील सर्व पोलीस ठाण्यातील पोलीस अधिकाऱ्यांशी समन्वय साधण्यात येणार आहे. पोलीस ठाण्यातील वरिष्ठ निरीक्षक, एक सहायक निरीक्षक, तीन पोलीस कर्मचाऱ्यांचा या पथकात समावेश राहणार आहे.



## बेवारस मृतदेह

शाहूनगर पोलीस ठाणे, मुंबई अपमृत्यु नोंद क्र. ४८/२०२४, कलम- १९४ भारतीय नागरिक सुरक्षा संहिता(बीएनएसएस) २०२३ अन्वये बेवारस पुरुष नामे मुकेश नेपाळी, वय अंदाजे- ४० वर्षे, बांधा- मजबूत, उंची- अंदाजे ५ फूट, रंग- निमगोरा, नेसणीस पॅन्ट व हिरवा टीशर्ट, असलेला इसम मिठी नदीच्या खाडीत शाहूनगर पोलीस ठाणे, मुंबई हद्दीमध्ये मिळून आला असून नमूद इसमाचे नातेवाईकांचा शोध घेणे सुरू आहे तरी कोणी ओळखत असल्यात खालील नंबरवर संपर्क करावा.



**संपर्क-**
**श्री.भाऊसाहेब गवारे, पोलीस उपनिरीक्षक**
**शाहूनगर पोलीस ठाणे, मुंबई**
**मोबाईल क्र : ७०२१०१३८४१**
**पोलीस ठाणे क्रमांक :**
**०२२२४०७३३२८**

# सिडकोच्या सागरी महामार्गावर खड्डे, जड वाहतुकीमुळे खोपटे पूल चौकात अपघाताची शक्यता

■ **उरण : विशेष प्रतिनिधी**

सिडकोच्या द्रोणागिरी ते पागोटे या सागरी महामार्गावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहेत. या मार्गाची दुरुस्ती मे २०२४ मध्ये करण्यात आली आहे. मात्र अवघ्या काही महिन्यांतच हा मार्ग नादुरुस्त झाला आहे. यात जड कंटेनर वाहनांची संख्या जास्त असल्याने खोपटे पूल चौकात पडलेले खड्डे धोकादायक बनले आहेत. या मार्गावरील खडी उखडल्याने दुचाकीवरून प्रवास करणाऱ्या वाहन चालकांना अपघात होऊ लागले आहेत. नवी मुंबईत जाणाऱ्या दुचाकीस्वाराचा तोल गेल्याने कंटेनर वाहनाखाली तो येता येता वाचला. गुरुवारी ही घटना घडली. तर याच चौकात एसटी बस आणि रिक्षा यांचा अपघात झाला होता. द्रोणागिरी नोड ते खोपटे पूल चौक या मार्गावरही खड्डे पडले आहेत. या मार्गावरील पथदिवे बंद असल्याने प्रवाशांना अंधार आणि खड्डे यांचा सामना करावा लागत आहे. उरणच्या जेएनपीटी ते पळस्पे या राष्ट्रीय महामार्गाला हा सागरी महामार्ग जोडण्यात आला आहे. त्यामुळे जेएनपीटी बंदरातून खोपटे आणि उरणच्या पूर्व विभागातील अनेक गोदामात ये-जा करणाऱ्या हजारो जड कंटेनर वाहनांमुळे हा मार्ग सतत वर्दळीला बनला आहे. त्याचप्रमाणे या मार्गावरून उरण, द्रोणागिरी नोड, खारपाडा किंवा अलिबागला जाणारी लहान प्रवासी वाहनेही याच मार्गाचा वापर करीत आहेत. त्यामुळे जड व प्रवासी वाहनांसाठी महत्वाचा असलेल्या या मार्गावरचे खड्डे हे अपघाताचे कारण ठरू लागले आहेत.



**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा. बां.) विभाग,**
**प्रशासकीय इमारत, १ ला मजला,**
**भवन्स कॉलेज जवळ, दादाभाई रोड, अंधेरी (प.), मुंबई- ४०००५८.**
E-mail-northmumbai.ee@mahapwd.gov.in

**ई -निविदा सुचना क्र. ३७ सन २०२४-२०२५**

महाराष्ट्र राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग, मुंबई (दुरध्वनी/फॅक्स क्रमांक- **२६२३१९६४/२६२०५७८८**) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडुन योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत **मुंबई उपनगर जिल्हा (पश्चिम उपनगरे) मजूर सहकारी संस्था मर्यादित, मुंबई,** यांच्या कडून खालील कामाकरीता **ब-१** नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर **https//mahatenders.gov.in** येथे उपलब्ध असतील. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग, मुंबई यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. अर्जदार मजूर संस्था ज्या उपनगरातील संबंधीत असेल त्याच उपनगरातील कामासाठी अर्ज करु शकतात.

| अ. क्र | कामाचेनाव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | मुळगौण कामांतर्गत तीन डोंगरी, गोरेगाव गोरेगाव (प.) मुंबई येथील रस्त्यापासून पंपरुमपर्यंत असलेल्या पायवाटेवर पेव्हर ब्लॉक बसविणेबाबत. | रु. १३२४६२०/- |
| २ | मुळगौण कामांतर्गत तीन डोंगरी, पोलिस वसाहतीतील पंपरुमच्या बाजूस असलेल्या रुमचे नुतनीकरण करणे. | रु. १५४५००३/- |
| ३ | मुळगौण कामांतर्गत तीन डोंगरी पोलिस वसाहत, इमारत क्र. जी, गोरेगाव (प.) मुंबई येथील पेव्हर ब्लॉक दुरुस्ती व नुतनीकरण करणेबाबत. | रु. २९८४७१२/- |
| ४ | मुळगौण कामांतर्गत गव्हर्नमेंट पॉलिटेक्निक कॅम्पस, वांद्रे (पू) येथील स्टॉर्म वॉटर ड्रेनेज लाइन्सची दुरुस्ती करणे. | रु.२७६०७५०/- |
| ५ | मुळगौण कामांतर्गत प्रादेशिक संचालक, तंत्रशिक्षण प्रशासकीय इमारत, वांद्रे (पू), मुंबई येथे टॉयलेट ब्लॉकचे नूतनीकरण करणे. | रु.२७१७१२५/- |
| ६ | मुळगौण कामांतर्गत गव्हर्नमेंट पॉलिटेक्निक कॅम्पस, वांद्रे (पू), मुंबई येथे बॅकसाइड कंपाऊंड मजबूत करणे | रु.३७०३९०९/- |
| ७ | मुळगौण कामांतर्गत शासकीय पॉलिटेक्निक कॅम्पस, वांद्रे (पू), मुंबई येथे बहुउद्देशीय प्रयोगशाळेचे नूतनीकरण आणि सुधारणा करणे | रु.२९०४४६७/- |
| ८ | मुळगौण कामांतर्गत गोरेगाव शाखेच्या अखत्यारीत पोलिस हवालदार वसाहतीतील इमारत क्रमांक २ (दुसरा मजला), आरे वनराई, गोरेगाव (पू.) मुंबई येथे दुरुस्ती आणि नुतनीकरण करणे. | रु. १००८५२१/- |
| ९ | मुळगौण कामांतर्गत सरकारी पॉलिटेक्निक कॅम्पस वांद्रे (ई) च्या एमएसबीटीई विभागाच्या चौथ्या मजल्यावर विंडोज आणि विविध कामांची दुरुस्ती करणे. | रु. ४४२२५२८/- |
| १० | मुळगौण कामांतर्गत आरे वनराई, गोरेगाव (पू), मुंबई येथील पोलिस वसाहतीतील, इमारत क्र. ३ मधील (पहिला मजला) येथील दुरुस्ती व नुतनीकरण करणे. | रु. ११८२७९१/- |
| ११ | शासकीय वसाहत वांद्रे पूर्व येथील इमारत क्र य-१ ते य-२ मधील ट्रेड्स आणि राइजर दुरूस्ती करणे , तसेच लँडिंग आणि मिड लँडिंग भागातील लादीकरण करणे आणि आरसीसी जाळी बदलणे व दुरूस्तीकरण करणे. | रु.२४५६१५०/- |
| १२ | मुळगौण कामांतर्गत शासकीय वसाहत वांद्रे पूर्व येथील इमारत क्र य-३ ते य-४ मधील ट्रेड्स आणि राइजर दुरूस्ती करणे , तसेच लँडिंग आणि मिड लँडिंग भागातील लादीकरण करणे आणि आरसीसी जाळी बदलणे व दुरूस्तीकरण करणे. | रु.२४६०८९०/- |
| १३ | मुळगौण कामांतर्गत शासकीय वसाहत वांद्रे पूर्व येथील इमारत क्र य-५ ते य-६ मधील ट्रेड्स आणि राइजर दुरूस्ती करणे , तसेच लँडिंग आणि मिड लँडिंग भागातील लादीकरण करणे आणि आरसीसी जाळी बदलणे व दुरूस्तीकरण करणे. | रु.२४६४९५०/- |
| १४ | मुळगौण कामांतर्गत शासकीय वसाहत वांद्रे पूर्व येथील इमारत क्र य-७ ते य-८ मधील ट्रेड्स आणि राइजर दुरूस्ती करणे , तसेच लँडिंग आणि मिड लँडिंग भागातील लादीकरण करणे आणि आरसीसी जाळी बदलणे व दुरूस्तीकरण करणे. | रु.२४५२९९०/- |
| १५ | मुळगौण कामांतर्गत शासकीय वसाहत वांद्रे पूर्व येथील इमारत क्र य-९ ते य-१० मधील ट्रेड्स आणि राइजर दुरूस्ती करणे , तसेच लँडिंग आणि मिड लँडिंग भागातील लादीकरण करणे आणि आरसीसी जाळी बदलणे व दुरूस्तीकरण करणे. | रु.२४४७२५०/- |
| १६ | मुळगौण कामांतर्गत शासकीय वसाहत वांद्रे पूर्व येथील इमारत क्र य-११ ते य-१२ मधील ट्रेड्स आणि राइजर दुरूस्ती करणे , तसेच लँडिंग आणि मिड लँडिंग भागातील लादीकरण करणे आणि आरसीसी जाळी बदलणे व व इतर अनुषंगिक कामे करणे. | रु.२४५०७५०/- |
| १७ | मुळगौण कामांतर्गत शिधावाटप कार्यालय क्र. २५ ड, अंधेरी (प), मुंबई येथील शिरीक्षक व आस्थापना रुम, शिधापत्रक विभाग व स्टोर रूम येथील अंतर्गत व बाहय गिलावा, रंगकाम, दरवाजे, खिडक्या, लादीकरण, फॉल सिलिंग, छतावरील शेड व इतर अनुषंगिक कामे करणे. | रु. ३६८६६०५/- |
| १८ | मुळगौण कामाअंतर्गत मालवणी पोलीस स्टेशन, मालाड (प), मुंबई येथे टेरेसवर मान्सून शेड बांधणे | रु.२२७९३२१/- |
| १९ | मुळगौण कामांतर्गत ६० खाटांचे रुग्णालय, मालवणी, मालाड मुंबई (ओपीडी आणि अपघाती वॉर्डचे नूतनीकरण) | रु. ४१३१६४०/- |
| २० | मुळगौण कामांतर्गत ६० खाटांचे रुग्णालय, मालवणी, मालाड मुंबई. (फायर फिटिंग पाण्याच्या टाकीसाठी नवीन जी.आय. पाईप लाईन पुरवणे आणि टाकणे) | रु. २०२३५८१/- |
| २१ | औदयोगिक प्रशिक्षण संस्था बोरीवली, मालाड (प) मुंबई येथे प्रसाधनगृहाचे नुतनीकरण करणे. | रु. २०१६३६२/- |
| २२ | मुळगौण बांधकामाअंतर्गत संजय गांधी निराधार योजना कार्यालय अंधेरी पश्चिम येथील सेतु कार्यालय तळ मजल्यावरील शौचालय दुरुस्ती व इतर अनुषांगिक कामे | रु.२२४७३९०/- |
| २३ | औदयोगिक प्रशिक्षण संस्था बोरीवली, मालाड (प) मुंबई येथील गच्चीवर गळतीप्रतीबंधक प्रक्रीया करणे. | रु.२८०३०३८/- |
| २४ | औदयोगिक प्रशिक्षण संस्था बोरीवली, मालाड (प) मुंबई येथील संरक्षण भिंतीची दुरुस्ती व फेंसींग वायर बसविणे. | रु.२६२४०९९/- |
| २५ | औदयोगिक प्रशिक्षण संस्था बोरीवली, मालाड (प) मुंबई येथील पावसाळी पाणी वाहून नेणा-या नालीची दुरुस्ती करणे. | रु.२४९७७५१/- |
| २६ | मुळगौण कामांतर्गत ६० खाटांचे सामान्य रुग्णालय जनकल्याण नगर, मालाड, मालवणी (प), मुंबई येथे स्लायडींग विंडो, सिमेंट गिलावा, रंगकाम इ. स्थापत्य विषयक कामे करणे. | रु.२४९९२४९/- |
| २७ | मुळगौण कामांतर्गत सामान्य रुग्णालय, मालवणी मलनिसारण वाहिन्या, जलनिसारण वाहिन्यांचे कामे करणे. | रु.२४९५८४२/- |
| २८ | मुळगौण कामाअंतर्गत तहसीलदार बोरीवली कार्यालयाच्या अधिपत्याखाली असलेल्या तलाठी कार्यालय-ग्रोवेल मॉल जवळ कांदिवली, मुंबई येथील संरक्षक भित तसेच इतर स्थापत्य विषयक दुरुस्तीची कामे करणे. | रु.४९३६९५४/- |
| २९ | मुळगौण बांधकामाअंतर्गत राज्य कामगार विमा रुग्णालय विलेपार्ले मुंबई येथे जिना , शौचालय दुरुस्तीव इतर अनुषांगिक कामे | रु.२४४८५८०/- |
| ३० | मुळगौण कामाअंतर्गत तहसीलदार बोरीवली कार्यालयाच्या अधिपत्याखाली असलेल्या तलाठी कार्यालय,शिंपोली, बोरीवली (प), मुंबई येथील तलाठी कार्यालयाच्या संरक्षक भिंतीची दुरुस्ती करुन बाह्य गिलावा करणे व कुंपण घालणे. | रु.४०९९१७३/- |
| ३१ | मुळगौण कामाअंतर्गत दहशतवाद विरोधी पथक कार्यालय चारकोप, कांदिवली गाव,पावनधाम मंदिररोड, महावीर नगर, कांदिवली (प.), मुंबई- येथे तिसऱ्या मजल्यावर स्टोअरेज व फर्निचरसह विविध स्थापत्य कामे करणे. | रु.३२६६८४५/- |
| ३२ | मुळगौण कामाअंतर्गत तहसीलदार बोरीवली कार्यालयाच्या अधिपत्याखाली असलेल्या तलाठी कार्यालय,मालवणी कांदिवली (प.), मुंबई या कार्यालयातील अंतर्गत गिलावा व रंगकाम करणे. | रु.३९५२६०८/- |
| ३३ | मुळगौण कामाअंतर्गत तहसीलदार बोरीवली कार्यालयाच्या अधिपत्याखाली असलेल्या तहसीलदार कार्यालय, शिंपोली, बोरीवलर (प), मुंबई येथील तहसील कार्यालयाची अंतर्गत पॉलीमर प्लास्टर सिलिंग आणि प्रसाधनगृहाची दुरुस्ती करणे. | रु.४२४०७२३/- |
| ३४ | मुळगौण कामाअंतर्गत तलाठी कार्यालय, एरंगळ चौपाटी, मालाड (प), मुंबई येथे बांधकाम व नुतनीकरण करणे. | रु. ३९७७९९३/- |
| ३५ | वृंदावन सोसायटी इमारत क्र. बी-२ मालाड (पू), मुंबई येथे ओव्हरहेड पाण्याची टाकी, जिना, टेरेस वॉटरप्रूफिंग आणि इतर विविध नागरी कामांची दुरुस्ती. | रु. १२३७७९८/- |
| ३६ | मुळगौण कामाअंतर्गत मेघवाडी पोलीस स्टेधन इमारत क्र.६ मध्ये अंतर्गत गिलावा, रंगकाम तसेच प्रसाधनगृह, स्नानगृह व दरवाजा खिडक्यांची दुरुस्ती करणे. | रु.१४११८१८/- |
| ३७ | मुळगौण कामाअंतर्गत मेघवाडी जोगेश्वरी (पूर्व), मुंबई येथील मेघवाडी पोलीस स्टेशन इमारत क्र.६ व पोलीस वसाहत इमारत क्र. ७ मधील जिन्याची, मुख्य खोलीची दुरुस्ती व इतर स्थापत्य विषयक कामे करणे. | रु.१८३८६८४/- |
| ३८ | मुळगौण कामाअंतर्गत मेघवाडी जोगेश्वरी (पूर्व), मुंबई येथील मेघवाडी पोलीस वसाहत इमारत क्र. ८ व ९ मधील जिन्याची, मुख्य खोलीची दुरुस्ती व इतर स्थापत्य विषयक कामे करणे. | रु.१४०३५२६/- |
| ३९ | मुळगौण कामांतर्गत इस्माईल युसूफ महाविद्यालय, जोगेश्वरी (पूर्व), मुंबई येथील बाहेरील प्लास्टर व रंगकाम इत्यादी स्थापत्य कामे करणे. | रु.२६१११३०/- |
| ४० | वार्षीक दुरुस्ती अंतर्गत पोलीस प्रशिक्षण केंद्र इमारत, कोळे कल्याण कलिना सांताक्रुझ (पूर्व) मुंबई येथे वार्षिक देखभाल दुरुस्तीची कामे करणे. (मार्च २०२५ अखेर) | रु. १५५६८६२/- |
| ४१ | वार्षीक दुरुस्ती अंतर्गत शासकीय तंत्र निकेतन बांद्रा (पूर्व) आवारातील मुख्य इमारती अंतर्गत वार्षिक देखभाल व दुरुस्तीची कामे करणे. (मार्च २०२५ अखेर) | रु. १३९८५४०/- |
| ४२ | मुळगौण कामाअंतर्गत तहसीलदार कार्यालय, कुरार, कांदिवली (प.), येथील अंतर्गत गिलावा व रंगकाम करणे. | रु.४९९४३४२/- |
| ४३ | मुळगौण कामाअंतर्गत तहसीलदार बोरीवली कार्यालयाच्या अधिपत्याखाली असलेल्या तलाठी कार्यालय, गोराई, बोरीवली (प). मुंबई येथे बांधकाम करणे. | रु.४५९५९६५/- |

टिप :- वरिल "ई" निविदा सुचना https//mahatenders.gov.in व **www.mahapwd.com** येथे पहावयास तसेच डाऊनलोड करावयास मिळेल. सदर निविदे सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास या वेब साईटवर कळविण्यांत येईल.

ई- निविदा उपलब्ध कालावधी- **दि.०३/१२/२०२४ ते दि. १७/१२/२०२४ पर्यंत**

**ई - निविदा उघडणे - दि. १८/१२/२०२४ दुपारी १५.०० वाजता.**

कार्यकारी अभियंता,
उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग,
अंधेरी, मुंबई.

जा.क्र.काअ/उमुंवि/निविदा/१०६१२
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
उत्तर मुंबई(सा.बां) विभाग,
प्रशासकीय इमारत, १ ला मजला,
भवन्स कॉलेजजवळ, दादाभाई मार्ग,
अंधेरी (प.) मुंबई ५८. दिनांक :- २५/११/२०२४

**डीजीआयपीआर/ २०२४-२०२५/४८४९**

# भाजपावाले आता ताजमहाल, लाल किल्ला व कुतुब मिनारही पाडणार का? संभलमधील दंगलीनंतर काँग्रेस आक्रमक



■ नवी दिल्ली : प्रगती शर्मा

काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी भारतीय जनता पार्टीच्या वरिष्ठ नेतृत्वावर जोरदार टीका केली आहे. खरगे म्हणाले, 'भाजपा सरकार देशातील मशिदींचं सर्वेक्षण करून समाजात दुही निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे. दिल्लीतल्या रामलीला मैदानावर दलित, अल्पसंख्याक, आदिवासी व इतर मागासवर्गीय समुदायाने आयोजित केलेल्या एका रॅलीला संबोधित करताना खर्गे म्हणाले, 'पंतप्रधान नरेंद्र मोदी अशा प्रकारच्या सर्वेक्षणांना परवानगी देऊन लोक एकजूट होऊ नयेत यासाठी प्रयत्न करत आहेत. भाजपाचे नेते लाल किल्ला, ताज महाल, कुतुब मिनार, चार मिनारसारख्या इमारती उद्धवस्त करणार आहेत का? कारण या इमारती मुसलमानांनी उभ्या केल्या आहेत'. उत्तर प्रदेशच्या संभलमधील दंगलीच्या घटनेवरून खर्गे यांनी भाजपावर टीका केली आहे. संभलमध्ये एका मशिदीचं सर्वेक्षण करण्याची परवानगी देण्यात आली आहे. या मशिदीच्या जागी आधी मंदिर होतं असा दावा हिंदू संघटनांनी केला आहे. खरंच तिथे मंदिर होतं का हे जाणून घेण्यासाठी सर्वेक्षण केलं जात आहे. त्यामुळे संभलमध्ये दंगल उसळली आहे.

मल्लिकार्जुन खर्गे म्हणाले, 'नरेंद्र मोदी हे सामान्य जनतेच्या विरोधात आहेत. कारण ते समान्य माणसांचा विरोध करतात. आमची लढाई ही त्याच तिरस्काराविरोधात आहे आणि त्यासाठीच राजकीय शक्ती गरजेची आहे. देशभर सगळीकडेच सर्वेक्षणं केली जात आहेत. मशिदींखाली मंदिरं शोधण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्याविरोधात आवाज उठवला जातोय. २०२३ मध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे नेते मोहन भागवत म्हणाले होते की केवळ राम मंदिर उभारणं हे एवढंच आमचं उद्दीष्ट आहे. आपण मशिदींखाली शिवालय अथवा मंदिरं शोधत बसू नये. मात्र मोदी सरकारची कृती भागवतांच्या वक्तव्याच्या विपरित आहे. मोदी म्हणतात की 'एक हैं तो सेफ हैं'. परंतु, त्यांच्या राजवटीत कोणीच सुरक्षित नाही. ते केवळ फोडा आणि राज्य करा या नितीचा अवलंब करत आहेत'.

## नुकसान भरपाईसाठी २७ वर्षे न्यायालयीन लढाई, अपघातातील मृताच्या वारसांना अखेर न्याय

■ नवी दिल्ली : वृत्तसंस्था

माळशिरस तालुक्यातील तांबवे येथे १९९७ साली सोलापूर जिल्हा परिषदेच्या जीप गाडीने ठोकरल्यामुळे मृत पावलेल्या यासीन अब्दुल खान यांच्या वारसांना नुकसान भरपाईची संपूर्ण रक्कम मिळण्यासाठी तब्बल २७ वर्षे न्यायालयीन लढा द्यावा लागला. एकीकडे न्यायालयात प्रचंड खटल्यामुळे न्याय मिळण्यास विलंब होत असताना दुसरीकडे अनावश्यक अपील केल्यामुळे आणि हलगर्जीपणामुळे जिल्हा परिषदेला नुकसान भरपाईची दुप्पट रक्कम भरावी लागली. सुरुवातीला सोलापूर न्यायालयाने मृताच्या वारसांना तीन लाख ४० हजार रुपये नुकसान भरपाई द्यावी, असा आदेश जिल्हा परिषदेला होता. पण त्या आदेशाचे पालन न करता जिल्हा परिषदेने मुंबई उच्च न्यायालयात अपील दाखल केले होते. अपिलाच्या सुनावणी दरम्यान जिल्हा परिषदेने पुन्हा हलगर्जीपणा दाखविला. स्वतःचे वकील आणि प्रतिनिधी न्यायालयात हजर राहिले नाहीत. त्यामुळे २०१९ मध्ये उच्च



न्यायालयाने जिल्हा परिषदेचे अपील फेटाळून लावले होते. त्यामुळे मृताच्या वारसांनी नुकसान भरपाईच्या रकमेच्या वसुलीसाठी २०१९ मध्ये अर्ज सादर केला असता जिल्हा परिषदेला त्यांनी केलेले अपील फेटाळले गेल्याचे लक्षात आले. त्यावर योग्य कार्यवाही करण्याऐवजी जिल्हा परिषदेने पुन्हा अपील रेकॉर्डर घेण्यात यावे, असा अर्ज दिला. अखेर उच्च न्यायालयात अपिलाची पुन्हा सुनावणी झाली आणि जिल्हा परिषदेचे अपील नुकतेच दुसऱ्यांदा फेटाळून लावले गेले. या प्रकरणातील मूळ नुकसान भरपाईची रक्कम तीन लाख ४० हजार, अधिक व्याज आणि दंड चार लाख ९१ हजार रुपये असे एकूण आठ लाख ३१ हजार रुपये जिल्हा परिषदेला आपल्या तिजोरीतून न्यायालयात भरावे लागले. ही सर्व रक्कम मृत यासीन अब्दुल खान (रा. तांबवे, ता. माळशिरस) यांच्या वारसांना मिळण्यासाठी २७ वर्षांचा कालावधी लागला. या प्रकरणात मृताच्या वारसांतर्फे ज्येष्ठ फौजदारी वकील धनंजय माने, ॲड. जयदीप माने, ॲड. एम एस मिसाळ, ॲड. सिद्धेश्वर खंडागळे, ॲड. सुहास कदम, ॲड. वैभव सुतार यांनी काम पाहिले.

## द्राक्षांचा हंगाम यंदा लांबणीवर

■ नवी मुंबई : धनश्री सट्टा

वाशीच्या मुंबई कृषी उत्पन्न बाजारात समितीत नोव्हेंबरअखेर तसेच डिसेंबरपासून द्राक्षांच्या हंगामाला सुरुवात होत असते. मात्र परतीच्या पावसाने उशिराने छाटणी झाली आहे, त्यामुळे यंदा बाजारात डिसेंबर अखेरीस द्राक्ष दाखल होण्यास सुरुवात होणार आहे. यावर्षी द्राक्षांचा हंगाम सुरू होण्यास विलंब होणार असल्याचे मत घाऊक व्यापारी व्यक्त करीत आहे. एपीएमसी बाजारात साधारणतः नोव्हेंबर-डिसेंबर महिन्यांत द्राक्षांची आवक सुरू होते. जानेवारीमध्ये द्राक्षांचे प्रमाण अधिक वाढते. साधारण १५ नोव्हेंबरनंतर द्राक्षाची आवक वाढत जाऊन साधारणपणे १५ एप्रिलपर्यंत हंगाम सुरू राहतो. बाजारात नाशिक, तासगाव, सातारा आणि सांगली या ठिकाणांहून अधिक आवक होत असते. मात्र यंदा पावसामुळे द्राक्षांच्या छाटणीलाच उशिरा सुरुवात झाली आहे. छाटणीला एक महिना उशीर झाल्याने उत्पादन घेण्यालाही विलंब होणार आहे. परिणामी द्राक्ष बाजारात दाखल होण्यासाठी जानेवारी महिन्याची वाट पहावी लागेल अशी माहिती सांगलीचे



बागायतदार नंदकुमार पवार यांनी दिली आहे. त्यामुळे यंदा एपीएमसी बाजारात एक महिना उशिराने द्राक्षांच्या हंगाम सुरू होणार आहे. ऑक्टोबर ते डिसेंबर या कालावधीत द्राक्षाच्या हंगाम सुरू होतो, ऑक्टोबर-नोव्हेंबर मध्ये अधिक प्रमाणात त्याची मूळ छाटणी सुरू होते. मात्र यावेळी ऐन छाटणीलाच पावसाने दमदार हजेरी लावल्याने हाताशी आलेले उत्पादन खराब झाले आहे.

## विमानतळबाधितांच्या आंदोलनाला ५५ दिवस पूर्ण, सरकार आणि सिडको प्रशासनाचे दुर्लक्ष

■ उरण : सुचिता देशमुख

वारंवार आंदोलन अर्ज, चर्चा करूनही नवी मुंबई विमानतळ बाधितांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष होत असल्याने ७ ऑक्टोबरपासून प्रकल्पग्रस्तांनी सिडको कार्यालयासमोर धरणे आंदोलन सुरू केले आहे. या आंदोलनाला ५५ दिवस पूर्ण झाले आहेत. मात्र त्यानंतरही आंदोलन सुरू असून नवीन सरकार स्थापन झाल्यानंतर चर्चा होण्याची अपेक्षा भूमिपुत्रांना आहे.

नवी मुंबई विमानतळ पूर्णत्वास जात आहे. येत्या एप्रिल २०२५ पर्यंत ते कार्यान्वित होणार आहे. मात्र या विमानतळासाठी आपले सर्वस्व असलेल्या जमिनी आणि राहती घरे देणाऱ्या भूमिपुत्रांचे पुनर्वसन अपूर्ण आहे. यासंदर्भात १ जुलैला पनवेल ते मुंबई मंत्रालय असा पायी लाँग मार्च काढला होता. त्यावेळी राज्याचे तत्कालीन मंत्री शंभुराज देसाई यांच्यासोबत चर्चा झाली, मात्र त्यानंतर कोणत्याही प्रकारची कारवाई न झाल्याने ७ ऑक्टोबरपासून प्रकल्पबाधितांनी आंदोलन सुरू केले आहे.




आपल्या मागणीसाठी हे प्रकल्पग्रस्त गेल्या पाच वर्षांपासून सातत्याने लढत आहेत. तरीही राज्य सरकार सिडको प्रशासन दुर्लक्ष करीत आहे. त्यांचे पूर्ण आणि कायद्याच्या चौकटीत योग्य पुनर्वसनाच्या मागणीसाठी नवी मुंबई आंतराष्ट्रीय विमानतळ समिती आणि अखिल भारतीय किसान सभा यांच्या संयुक्त विद्यमाने हे बेमुदत आंदोलन सुरू करण्यात आले आहे. या आंदोलनाला जनतेकडून जाहीर पाठिंबा मिळत आहे. विमानतळ समितीचे अध्यक्ष अनिल पाटील, विशाल भोईर, किसान सभेचे रायगड जिल्हा अध्यक्ष रामचंद्र म्हात्रे, सचिव संजय ठाकूर, चांगुणा डाकी, किरण केणी यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन सुरू आहे. बाधित झालेल्या मच्छीमारांना २०१३ च्या भूसंपादन आणि पुर्नवसन कायदा लागू करा. विमानतळबाधित दहा गावांतील १८ वर्षांवरील सर्व तरुणांना विमानतळ प्रकल्पात सामावून घेणारे रोजगार प्रशिक्षण द्या – वाघिवली गावातील प्रकल्पग्रस्तांच्या भूखंडाचे त्वरित वाटप करा.

## 'राज्यात १३ लाख अतिरिक्त मतदार', जितेंद्र आव्हाडांनी गणितच मांडलं; निवडणूक आयोगालाही सवाल!

■ ठाणे : तृप्ती गोरे

विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर विरोधकांनी ईव्हीएम घोटाळा झाल्याचा आरोप केला. तसंच, ते विजयी का ठरले याची सविस्तर माहितीच त्यांनी दिली होती. आता जितेंद्र आव्हाडांनी वाढलेल्या मतदारांचा मुद्दा उपस्थित केलाय. यावेळी त्यांनी वाढलेल्या मतदारांच्या घोटाळ्याचं गणितच एक्सवर मांडलंय. जितेंद्र आव्हाड म्हणाले, 'महाराष्ट्राच्या निवडणुकीतील आकडेवारी जुळता जुळेना ! निवडणूक आयोगानुसार, महाराष्ट्रातील एकूण मतदार ९, ६४,८५,७६५ आहेत आणि यंदा मतदानाची टक्केवारी ६५.०२३ होती. साधे गणित आह, ६५.०२ टक्के भागिले ९ ६४, ८५, ७६५ ८ ६, २७, ३५, ०४४.४ परंतु ँ६ ने ६,४०,८८,१९५ लोकांनी मतदान केल्याची नोंद केली आहे. यात अतिरिक्त १३ लाख ५३ हजार १५१ मते आहेत.''इतकेच नाही, तर ६५.०२ टक्के केल्यास त्यात ०.४ मतं असं गणित येतं. राज्यातच काय, संपूर्ण विश्वात अपूर्णांक मतं कशी असू शकतात?', असा सवालही जितेंद्र आव्हाडांनी उपस्थित केला. १३ लाख अतिरिक्त मते आली कुठून? आता मतदार नोंदणी पाहू. २०१९ ते २०२४ (५ वर्षे) महाराष्ट्रातील मतदारांची संख्या ५० लाखांनी वाढली, म्हणजे सरासरी प्रतिवर्षी १० लाख. पण २०२४ च्या सार्वत्रिक आणि विधानसभा निवडणुकांदरम्यान अवघ्या ६ महिन्यांत मतदारांची



संख्या ४२ लाखांनी वाढली. ६ महिन्यांत ४२ लाख वाढ म्हणजे ८४ लाख/वर्षाचा वाढीचा दर, जो गेल्या ५ वर्षांतील सरासरी वार्षिक दराच्या ८.४ पट आहे!', हे स्पष्टीकरणही जितेंद्र आव्हाडांनी दिलं. 'हा मतदार नोंदणीचा चमत्कार आहे की मतांमध्ये फेरफार आहे, हे तुम्हीच ठरवा. मतांमधील या विसंगती दोन गंभीर प्रश्न निर्माण करतात: १. मतं वाढवण्यासाठी ईव्हीएममध्ये छेडछाड केली का?, २. ँ६ चुकीचा किंवा फेरफार केलेला डेटा प्रकाशित करत आहे का? दोघांपैकी काही जरी झालं असेल, तरी हा प्रकार निवडणूक प्रक्रियेवरील जनतेचा विश्वास कमी करतोय', असं जितेंद्र आव्हाड म्हणाले.

## सेवानिवृत्त अधिकाऱ्याची तीन कोटी रुपयांना ऑनलाईन फसवणूक

■ ठाणे : तृप्ती गोरे

सेवानिवृत्त अधिकाऱ्याची तीन कोटी दोन लाख रुपयांची ऑनलाईन फसवणूक करण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी चितळसर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून हे प्रकरण आता सायबर गुन्हे शोध पथकाकडे वर्ग केले जाणार आहे. फसवणूक झालेले ५९ वर्षीय सेवानिवृत्त अधिकारी घोडबंदर भागात वास्तव्यास आहेत. ते शेअर बाजारात पैसे गुंतवित असतात. सुमारे दोन महिन्यांपूर्वी त्यांच्या टेलेग्राम या ॲपमध्ये एक संदेश प्राप्त




झाला होता. या संदेशावर त्यांनी प्रवेश केल्यानंतर त्यांच्या मोबाईलमध्ये एक ॲप डाऊनलोड झाले. तसेच त्यांचा मोबाईल क्रमांक व्हॉट्सॲप ग्रुपमध्ये सामाविष्ट करण्यात आला. ॲपमध्ये त्यांची माहिती नोंद करण्यास सांगण्यात आली. त्यानुसार त्यांनी माहिती नोंद केली. काही दिवसांनी त्यांना संबंधित ॲपमधून काही शेअर खरेदी करण्यास सांगितले. त्यानुसार, त्यांनी तीन कोटी दोन लाख रुपयांचे शेअर टप्प्याटप्प्याने खरेदी केली. परंतु त्यांनी गुंतवणूक केलेल्या रकमेतील परतावा त्यांना मिळत नव्हता. त्यांनी याबाबत व्हॉट्ससंदेश ॲपमधील व्यक्तींना पाठविला. परंतु त्यांना कोणताही प्रतिसाद मिळत नव्हता. संबंधित ॲप शेअर बाजाराचे नसून आपली फसवणूक झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यानंतर त्यांनी या प्रकरणी चितळसर पोलीस ठाण्यात फसवणूकीची तक्रार दाखल केली.

## पुण्यात स्वतंत्र सरकारी कर्करुग्णालय उभे राहणार; ससून रुग्णालय प्रशासनाने घेतला पुढाकार

■ पुणे : अभिजीत येरल्लू

पुण्यात स्वतंत्र कर्करुग्णालय व्हावे, अशी मागणी खूप वर्षांपासून आहे. ससून रुग्णालयाशेजारील महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या (एमएसआरडीसी) भूखंडावर कर्करुग्णालय उभारण्याची चर्चा अनेक वर्षे सुरू होती. परंतु, एमएसआरडीसीने हा भूखंड हा खासगी विकसकाला दिल्याने त्याबाबत अनिश्चितता निर्माण झाली होती. आता औंध उरो रुग्णालयातील जागेवर कर्करुग्णालय उभारण्यासाठी ससून रुग्णालय प्रशासनाने पुढाकार घेतला आहे. बी. जे. वैद्यकीय महाविद्यालय तथा ससून सर्वोपचार रुग्णालयाचा ४०० ते ५०० रुग्णशय्येचे कर्करुग्णालय आणि संशोधन केंद्र उभारण्याचा प्रस्ताव आहे. या केंद्रात कर्करोगावरील प्रगत उपचार होतील आणि त्याला संलग्न पदव्युत्तर वैद्यकीय



महाविद्यालयही असेल. कर्करुग्णालयाच्या उभारणीसाठी ६० टक्के निधी केंद्र सरकार देईल आणि ४० टक्के निधी राज्य सरकारचा वैद्यकीय शिक्षण विभाग देईल, असा प्रस्ताव आहे. कर्करुग्णालयात या माध्यमातून पुरेसा निधी मिळवून आधुनिक दर्जाची आरोग्य सुविधा उभारण्याचे नियोजन आहे. सध्या कर्करुग्णांना उपचारासाठी मुंबईला जावे लागते. भविष्यात नवीन सुविधा उभी राहिल्यास पुण्यासह पश्चिम महाराष्ट्रातील रुग्णांवर येथे उपचार होऊ शकतील, अशी माहिती सूत्रांनी दिली. वैद्यकीय शिक्षण विभागाने कर्करुग्णालयाच्या उभारणीचा आराखडा तयार करण्यासाठी तज्ज्ञांची पाच सदस्यीय समिती स्थापन केली होती. या समितीने कर्करुग्णालय आणि पदव्युत्तर महाविद्यालयाचा आराखडा तयार केला आहे. हा आराखडा अंतिम टप्प्यात असून, तो जिल्हाधिकाऱ्यांना पुढील आठवड्यात सादर करण्यात येणार आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी या प्रकल्पासाठी जमीन देण्याचे आश्वासन दिलेले आहे. औंध उरो रुग्णालयाची एकूण ८५ एकर जागा आहे. त्यातील १० एकर जागेवर कर्करुग्णालय उभारण्याचा प्रस्ताव आहे, असे सूत्रांनी स्पष्ट केले.

## महाकुंभमेळ्यासाठी स्वतंत्र जिल्ह्याची घोषणा; योगी आदित्यनाथ सरकारचा मोठा निर्णय!

■ प्रयागराज : वृत्तसंस्था

बारा वर्षातून एकदा होणाऱ्या महाकुंभ मेळव्यासाठी उत्तर प्रदेशमध्ये जोरदार तयारी चालू आहे. महाकुंभमेळ्याच्या परिसरामध्ये व्यवस्था आणि इतर बाबींच्या तरतुदीसाठी प्रशासनाकडून वेगवेगळ्या बाबींवर काम केलं जात आहे. अवघ्या दोन महिन्यांवर महाकुंभमेळा आलेला असताना देशभरातल्या भाविकांनी प्रशासनाला या काळात या भागातील व्यवस्थापनासाठी मोठी कसरत करावी लागते. त्यासाठी मोठ्या प्रमाणावर बंदोबस्त तैनात केला जातो. आत्तापर्यंत प्रयागराज जिल्हा प्रशासनाकडून महाकुंभमेळ्याचं व्यवस्थापन पाहिलं जात होतं. पण आता महाकुंभमेळ्यासाठी स्वातंत्र जिल्ह्याची घोषणा करण्यात आली आहे.प्रयागराजमधील ज्या भागात महाकुंभमेळा भरवला



प्रयागराजला जाण्याची तयारी सुरू केली आहे. त्यातच उत्तर प्रदेश सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. महाकुंभ मेळ्यासाठी एक आख्खा स्वतंत्र जिल्हाच योगी सरकारनं जाहीर केला आहे. या जिल्ह्याचं पूर्ण व्यवस्थापन स्वतंत्र असेल. शिवाय या जिल्ह्याचं नावदेखील महाकुंभमेळ्यावरूनच ठेवण्यात आलं आहे. पुढील वर्षी १३ जानेवारी रोजी महाकुंभ मेळ्याला सुरुवात होईल. २६ फेब्रुवारी २०२५ पर्यंत हा भक्तीसोहळा चालेल. प्रयागराजमध्ये दर १२ वर्षांनी महाकुंभ मेळ्याचं आयोजन केलं जातं. यामध्ये लाखोंच्या संख्येनं देश-विदेशातून भाविक, साधू, तपस्वी येतात. जातो, त्या संपूर्ण भागाचा एक जिल्हा घोषित करण्यात आला आहे. त्या जिल्ह्याला 'महा कुंभ मेळा' असं नामकरण करण्यात आलं आहे. या जिल्ह्याचं व्यवस्थापन पूर्ण स्वतंत्रपणे होईल. महा कुंभ मेळ्याचं आयोजन आणि त्यासंदर्भातल्या सर्व बाबींची पूर्तता व्यवस्थितपणे व्हावी, यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याचं उत्तर प्रदेश सरकारकडून स्पष्ट करण्यात आलं आहे. प्रयागराजचे जिल्हाधिकारी रविंद्र कुमार मांदाद यांच्यानावे यासंदर्भातलं परिपत्रक जारी करण्यात आलं आहे. २३ नोव्हेंबर २०२४ रोजीची ही अधिसूचना असून त्यात स्वतंत्र जिल्ह्याची नोंद करण्यात आली आहे.

## लाखाच्या फरकाने पराभव, तरीही युगेंद्र पवारांचा मत पडताळणीसाठी अर्ज; म्हणाले, 'जर अधिकार असेल...'

■ मुंबई : सम्यक कासारे

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा निकाल २३ नोव्हेंबर रोजी जाहीर करण्यात आला आहे. ज्यामध्ये महायुतीला मोठा विजय मिळाला तर दुसरीकडे महाविकास आघाडीला मात्र दारूण पराभवाला सामोरे जावे लागले. यानंतर महायुतीच्या अनेक नेत्यांकडून निवडणूक प्रक्रियेवर आक्षेप घेतले जात आहेत. यामध्ये काँग्रेसचे नेते नाना पटोले, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे नेते रोहित पवार आणि जितेंद्र आव्हाड आणि इतर काही नेत्यांचा समावेश आहे. यादरम्यान पराभूत उमेदवारांकडून मत पडताळणीसाठी निवडणूक आयोगाकडे अर्ज दाखल केले जात आहेत. यादरम्यान पुणे जिल्ह्यातील ११ उमेदवारांनी मत पडताळणीचा अर्ज दाखल केला आहे. बारामती विधानसभा मतदारसंघात अजित पवारांविरोधात निवडणुकीच्या रिंगणात उतरलेले शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे नेते युगेंद्र पवार यांनीदेखील मत पडताळणीसाठी अर्ज केला आहे. याबद्दल बोलताना युगेंद्र पवार म्हणाले की, 'जिल्ह्यातून अकरा अर्ज मतपडताळणीसाठी दिले आहेत. फक्त माझाच पराभव झाला असता तर मी तो केला देखील नसता. बारामतीत कोणी उभं राहायला पण तयार होत नाही. आम्ही तिथं उभे राहिलो, विचारांना आणि पवारांना (शरद पवार) सोडलं नाही. बारामतीच्या स्वाभिमानी जनतेसाठी उभा राहिलो. पण आमच्या पुढची ताकद पण मोठी होती. पण असा निकाल फक्त माझ्यासाठी लागला असता तर ठीक



आहे. पण अख्खा महाराष्ट्रात संशय आणि संभ्रमाचे वातावरण आहे. मोठे-मोठे दिग्गज नेते जे त्यांच्या मतदारसंघात अनेक दशकांपासून निवडून येत आहेत, त्यांचा पराभव झाला आहे. त्यामुळे आम्हाला वाटतं की काहीतरी असण्याची शक्यता आहे'. मत पडताळणी करण्याबाबत पुढे बोलताना ते म्हणाले की, 'सुप्रीम कोर्टाने हा अधिकार आम्हाला दिला आहे. पाच टक्के ईव्हीएम तुम्ही तपासू शकता. जर अधिकार असेल आणि संशयाचे वातावरण असेल तर तपासणी करायला काय हरकत आहे?' दरम्यान विधानसभा निवडणुकीच्या प्रक्रियेबाबत संशय निर्माण झाल्याच्या पार्श्वभूमीवर ज्येष्ठ समाजसेवक डॉ. बाबा आढाव यांनी आत्मक्लेश आंदोलन सुरू केले होते. यानंतर महाविकास आघाडी आणि महायुतीतील नेत्यांनी त्यांची भेट घेतली होती. याबद्दल युगेंद्र पवार म्हणाले की, 'शेवटी ते (बाबा आढाव) खूप वरिष्ठ आहेत, ९५ वर्ष त्यांचं वय आहे. त्यांनी अनेक निवडणुका पाहील्या आहेत. महाराष्ट्राच्या स्थापनेपासून ते निवडणुका पाहात आले आहेत. त्यांना काहीतरी वेगळं झालेलं दिसत असेल तर ते आपल्याला गांभिर्याने घ्यावे लागेल'. विधानसभा निवडणुकीत बारामती विधानसभा मतदारसंघाकडे अवघ्या राज्याचे लक्ष लागले होते. येथे अजित पवार विरूद्ध युगेंद्र पवार असा सामना पाहायला मिळाला.